नागपूर, मंगळवार
१ जुलै २०२५
वर्ष : ११ अंक : ९१
पृष्ठ : ४ मुल्य : २ रुपये
RNI Reg. No. MAHMAR/2015/61546
Postal Reg.No. NPCity/447/2024-26

# स्वर्णभूमी

मराठी दैनिक

## पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर पुन्हा बरळले

स्वर्णभूमी न्यूज



कराची : पहलगाम दहशतवादी हल्ल्याला भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून चोख उत्तर दिल्यानंतरही पाकिस्तानच्या कुरापती अजूनही सुरूच आहेत. पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर यांनी जम्मू आणि काश्मीरमध्ये सक्रिय असलेल्या दहशतवादी संघटनांना पाठिंबा दिला असून, भारत ज्याला दहशतवाद म्हणतो तो 'कायदेशीर संघर्ष' आहे, असे वक्तव्य केले आहे. याचबरोबर, पाकिस्तान काश्मिरी लोकांना राजकीय, राजनैतिक आणि नैतिक पाठिंबा देत राहील, असेही म्हटले आहे.

मुनीर यांनी पाकिस्तान नौदल अकादमीतील पासिंग आऊट परेडला संबोधित करताना हे विधान केले. यावेळी त्यांनी असेही म्हटले की, भारताने 'पाकिस्तानविरुद्ध दोनदा विनाकारण आक्रमण केले आहे' आणि भविष्यात होणाऱ्या आक्रमणाची जबाबदारी पूर्णपणे आक्रमण करणाऱ्यावर असेल. मुनीर यांनी भारताविरुद्ध गरळ ओकण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या एका आठवडा आधी, १६ एप्रिल रोजी इस्लामाबादमध्ये झालेल्या परदेशी पाकिस्तानी नागरिकांच्या एका कार्यक्रमात मुनीर यांनी वादग्रस्त विधान केले होते. त्यांनी काश्मीरचे पाकिस्तानच्या 'गळ्याची नस' म्हणून वर्णन केले होते. दरम्यान मुनीर यांच्या या ताज्या विधानांवर भारतीय अधिकाऱ्यांकडून त्वरित कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही. पण, मुनीर यांच्या काश्मीरबाबतच्या मागील टिप्पण्या परराष्ट्र मंत्रालयाने फेटाळून लावल्या होत्या. ''भारत ज्याला दहशतवाद म्हणतो तो आंतरराष्ट्रीय नियमांनुसार एक कायदेशीर संघर्ष आहे. ज्यांनी काश्मिरी लोकांच्या इच्छेला दडपण्याचा प्रयत्न केला आणि तोडगा काढण्याऐवजी संघर्षाला खतपाणी घालण्याचा प्रयत्न केला आहे'', असे मुनीर कराची येथे उच्च लष्करी अधिकारी, नागरी अधिकारी आणि राजनयिकांच्या मेळाव्यात बोलताना म्हणाले. ''आम्ही काश्मिरी लोकांच्या अधिकारासाठी आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या ठरावांनुसार व काश्मीरच्या लोकांच्या आकांक्षेनुसार आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त ठरावाद्वारे दीर्घकाळ चाललेल्या वादाचे निराकरण करण्यासाठी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत,'' असे ते पुढे म्हणाले. आपल्या भाषणात मुनीर यांनी असा दावा केला की, दोनदा भारतीय लष्करी हल्ला उधळून लावल्यानंतर पाकिस्तानने स्वत:ला सिद्ध केले आहे.

## कर्नाटकमध्ये मुख्यमंत्री बदलाचे वारे

### निर्णय हायकमांड घेईल : मल्लिकार्जुन खरगे

स्वर्णभूमी न्यूज

बेंगळुरू : कर्नाटकला पुढील तीन महिन्यांत नवीन मुख्यमंत्री मिळेल अशी अटकळ राजकीय वर्तुळात सुरू असताना, एआयसीसी अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सोमवारी सांगितलं की, पक्ष हायकमांड या प्रकरणावर निर्णय घेईल. मुख्यमंत्री बदलणे हायकमांडच्या हातात आहे. हायकमांडमध्ये काय चालले आहे हे कोणीही सांगू शकत नाही. ही बाब हायकमांडवर सोपवली आहे आणि हायकमांडला पुढील कारवाई करण्याचा अधिकार आहे,'' असं खरगे यांनी बेंगळुरूमध्ये पत्रकारांना सांगितलं.

काही काँग्रेस आमदारांच्या विधानांवर खरगे प्रतिक्रिया देत होते. आमदार असं म्हणालेत की, मुख्यमंत्री सिद्धरामय्या पुढील तीन महिन्यांत उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांना पदभार देतील. तसंच काही आमदारांचं असं म्हणणं आहे की, सप्टेंबरनंतर राज्याच्या राजकारणात बदल होतील. यावर खरगे यांनी त्यांच्या पक्षाच्या आमदारांना आणि नेत्यांना या विषयावर वक्तव्य करू नये असे सांगितले. ''कोणीही अनावश्यक समस्या निर्माण करू नये,'' असं ते म्हणाले.

कर्नाटकमध्ये गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस सरकारमधील नेतृत्वातील संभाव्य बदलाबाबत काँग्रेस मंत्री आणि आमदार विधाने करत आहेत. सिद्धरामय्या यांचे जवळचे सहकारी असलेले सहकार मंत्री के. एन. रजन्ना यांनी सप्टेंबरनंतर कर्नाटकच्या राजकारणात बदल होईल असं विधान केलं. त्यानंतर यासंदर्भातील चर्चांना तोंड फुटलं. ते कोणत्या बदलाबद्दल बोलत आहेत हे त्यांनी उघड केलं नाही, परंतु राजकीय वर्तुळात सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्यात हाय कमांडने केलेल्या सत्तावाटप कराराशी याचा संबंध जोडण्यात आला. करारानुसार, दोघेही ३० महिने प्रत्येकी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे सांभाळतील. उल्लेखनीय बाब म्हणजे सिद्धरामय्या नोव्हेंबरमध्ये मुख्यमंत्रिपदाची अडीच वर्षे पूर्ण करत आहेत.

काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार बसवराज रायरेड्डी, जे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार देखील आहेत, म्हणाले की, सिद्धरामय्या आणखी तीन वर्षे मुख्यमंत्री म्हणून राहतील कारण त्यांना बहुसंख्य काँग्रेस आमदारांचा पाठिंबा आहे. रामनगर येथील आणखी एक काँग्रेस आमदार इक्बाल हुसेन यांनी रायरेड्डींना प्रत्युत्तर दिलं की, शिवकुमार पुढील तीन महिन्यांत मुख्यमंत्री होतील. ''सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्यात सत्ता वाटपाचा करार झाला आहे. त्यानुसार, शिवकुमार मुख्यमंत्री होतील,'' असं ते म्हणाले.

कर्नाटकमध्ये जो काही बदल करण्यात येईल तो हायकमांडच्या हातात आहे. हायकमांडच्या मनात काय चालले आहे ते कोणीही सांगू शकत नाही. ही बाब हायकमांडवर सोपवली आहे. हायकमांडला पुढील कारवाई करण्याचे अधिकार आहेत. येथे अनावश्यकपणे कोणीही समस्या निर्माण करू नये. त्यामुळे पुढील काही दिवसात कर्नाटकच्या राजकारणाचे पुढील चित्र स्पष्ट होईल असे दिसते.

## कोकणातील साकवांची जागा आता पूल घेणार

स्वर्णभूमी न्यूज



रत्नागिरी : कोकणाच्या तीन जिल्ह्यांत असलेल्या साकवांची जागी लवकर पूल बांधण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. यासाठी आता ग्रामपंचायत स्तरावर आराखडा बनविण्याचे काम केले जात असल्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले.

कोकणातील जास्तीत जास्त जमीन सिंचनाखाली येण्यासाठी जलसंधारणाची कामे झाली पाहिजेत. कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांतील ग्रामपंचायतीमार्फत चार महिन्यांपासून साकवांचा आराखडा तयार करण्यात येत असल्याची माहिती मंत्री कदम यांनी सांगितले. ग्रामविकास खात्यामार्फत पूल बांधत असताना रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील ग्रामपंचायतीकडून साकवांची माहिती घेण्यात आली आहे.

## सावधान! जुलै महिन्याच्या सुरुवातीला पावसाची तुफान हजेरी

स्वर्णभूमी न्यूज

दिल्ली : दक्षिणेकडून उत्तरेकडे सरसावलेल्या मान्सूनने उत्तरेकडील राज्यांमध्ये जोरदार हजेरी लावली आहे. हिमाचलमध्ये पावसाने हाहाकार उडाला असून भूस्खलनामुळे १२९ रस्त्यांवरील वाहनांचे वाहतूक थांबली आहे. बिहार उत्तराखंड झारखंड मध्य प्रदेश व राजस्थानसारख्या राज्यांना पावसाचे तीव्र अलर्ट देण्यात आले आहेत. दरम्यान महाराष्ट्रातही पुढील ४ दिवस दमदार पाऊस होणार असल्याचं हवामान विभागाने सांगितले. जुलै महिन्याच्या सुरुवातीला महाराष्ट्रात पावसाचे हायअलर्ट देण्यात आले आहेत.

राज्यभरात आज मराठवाड्यासह पश्चिम व मध्य महाराष्ट्रात पावसाने जोरदार हजेरी लावली. छत्रपती संभाजीनगरसह बीड, जालन्यासह परभणी, लातूर, नांदेड, हिंगोली भागात पाऊस झाला. विदर्भात तीन दिवसांच्या विश्रांतीनंतर वाशिमसह बहुतांश जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस पडला.

पुढील चार दिवस पावसाचे: ⛈

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार पुढील चार दिवस राज्यभरात विविध ठिकाणी पावसाचे अलर्ट देण्यात आले असून कोकण किनारपट्टीसह मुंबई, ठाणे तसेच उत्तर महाराष्ट्र व विदर्भात पावसाचे तीव्र अलर्ट देण्यात आले आहेत. मराठवाड्यातही जोरदार पावसाची शक्यता असून मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

आज संपूर्ण कोकण किनारपट्टीवर पावसाचा येलो अलर्ट असून रायगड ठाण्यातही येलो अलर्ट आहे. पुणे सातारा आणि कोल्हापूरच्या घाट परिसरातही जोरदार पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. जळगाव छत्रपती संभाजी नगर अहिल्यानगर बीड जालना परभणी नांदेड हिंगोली लातूर या जिल्ह्यांमध्ये पावसाचा येलो अलर्ट असून वर्धा नागपूर भंडारा गोंदिया गडचिरोली आणि चंद्रपुरातही पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय.

१ जुलै: रायगड, रत्नागिरी ,सिंधुदुर्ग, नंदुरबार, धुळे, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, अमरावती नागपूर भंडारा या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आलाय.

२ जुलै: सिंधुदुर्ग रत्नागिरी रायगड तसेच कोल्हापूर सातारा पुणे व नाशिक घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.मुंबई ,पालघर, ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, जालना, अमरावती ,वर्धा, नागपूर, चंद्रपूर ,भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांना येलो अलर्ट

## राजा रघुवंशी हत्या प्रकरणी पोलिसांच्या हाती पुरावे

स्वर्णभूमी न्यूज

इंदूर : मधुचंद्राला गेलेले राजा रघुवंशी आणि त्याची पत्नी सोनम हे दोघेही बेपत्ता झाले ही बातमी मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात आली होती. त्यांची शोध मोहीम सुरु होती. मात्र २ जून रोजी राजाचा मृतदेह पोलिसांना सापडला. त्यानंतर ८ जून रोजी जेव्हा सोनम पोलिसांना शरण आली तेव्हा सोनमनेच सुपारी किलर्सच्या मदतीने राजाची हत्या घडवून आणल्याचं पोलिसांना सांगितलं. या कटात तिचा प्रियकर राज कुशवाहाही सहभागी होता.

मेघालय पोलिसांना मिळाला सोनमचा लॅपटॉप आणि सोन्याचे दागिने

मेघालय पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार राजा रघुवंशी हत्या प्रकरणात त्यांना आता सोनमचा लॅपटॉप आणि तिने बरोबर घेतलेले दागिने मिळाले आहेत. राजा रघुवंशीच्या गळ्यात हनिमूनला गेलेला असताना जी सोन्याची साखळी होती ती सोनमने काढून घेतली होती. ती सोनसाखळी विशेष तपास पथकाने जप्त केली आहे. तसंच सोनम रघुवंशीचा लॅपटॉप आणि काही महत्त्वाची कागदपत्रं पोलिसांना सापडली आहेत. सिलोम जेम्सच्या घरावर जेव्हा पोलिसांनी छापा मारला तेव्हा त्यांना ही कागदपत्रं आणि इतर पुरावे सापडले आहेत.

राज कुशवाहाला अटक केल्यानंतर सोनम आली शरण

इस्ट खासी हिल्सचे पोलीस अधीक्षक विवेक सैय्याम यांनी दिलेल्या माहितीनुसार २३ मे रोजी राजा रघुवंशीची सोनम आणि तिचा प्रियकर राज कुशवाहा यांनी सुपारी किलर्सकडून हत्या घडवून आणली. राजाचा मृतदेह २ जून रोजी पोलिसांना आढळून आला. मात्र सोनम रघुवंशी तरीही बेपत्ता होती. सुरुवातीला पोलिसांना हे लूट आणि अपहरण याचं प्रकरण वाटलं होतं. मात्र पोलिसांनी जेव्हा सोनम रघुवंशीचे फोन रेकॉर्ड तपासले तेव्हा राज कुशवाहाशी ती सातत्याने संपर्कात होती हे कळलं. पोलिसांनी राज कुशवाहाला अटक केली. त्यानंतर ८ जून रोजी सोनम पोलिसांना शरण आली.

२३ मे च्या दिवशी नेमकं काय घडलं?

२३ मे रोजी राजा आणि सोनम हे दोघंही शिपारा होम स्टे या ठिकाणी आले. पहाटे ५ वाजून ३० मिनिटांनी या दोघांनी चेक इन केलं. त्यानंतर सहा वाजण्याच्या सुमारास राजा आणि सोनम हे दोघंही ट्रेकला जाण्यासाठी तयार झाले. याचवेळी सोनमने ज्या तिघांना राजाच्या हत्येची सुपारी दिली होती ते तिघेही जवळच्या एका होम स्टेमध्ये राहिले होते. साधारण १० वाजण्याच्या सुमारास सोनम आणि राजाने ट्रेक करत असताना २ हजार पायऱ्यांचं अंतर पार केलं. त्याआधी त्यांची भेट आनंद, आकाश आणि विशाल यांच्याशी झाली होती. साधारण १० वाजण्याच्या सुमारास राजा, सोनम, आकाश, विशाल आणि आनंद या पाचही जणांना अल्बर्ट या टुरिस्ट गाईडने पाहिलं होतं. अल्बर्टने दिलेल्या जबाबामुळेच सोनमच यामागे असावी हे पोलिसांच्या लक्षात आलं आणि त्या अनुषंगाने त्यांनी तपासाची चक्रं फिरवली. या टुरिस्ट गाईने दिलेल्या माहितीनुसार सोनम या चार जणांच्या मागून चालत होती तर तिच्या चालण्याचा वेग थोडा मंदावला होता.

राजाची हत्या सोनमने केलेल्या इशाऱ्यानंतरच दुपारी १२.३० च्या दरम्यान सोनमने राजाची आई उमा रघुवंशी यांना फोन केला. मी खूपच दमले आहे आणि उपास ठेवला आहे असं तिने सासूला म्हणजेच राजाच्या आईला सांगितलं. त्यावेळी उमा रघुवंशी राजाशीही बोलल्या. राजाशी हा आपला शेवटचा संवाद आहे हे तेव्हा त्यांना मुळीच वाटलं नव्हतं. साधारण आणखी अर्ध्या तासाने दुपारी १ ते १.३० च्या सुमारास हे पाचही जण मावलखियाट या ठिकाणाहून वेई सावदोंग धबधब्याच्या दिशेने निघाला. त्यावेळी सोनलने या तिघांना इशारा केला ज्यानंतर राजाच्या डोक्यावर चाकू हल्ला करण्यात आला. राजाची हत्या करण्यात आली तेव्हा सोनम तिथेच उपस्थित होती. राजाच्या हत्येनंतर सोनमने राजाच्या मोबाइलवरुन सात जन्मो का साथ असं लिहून एक सोशल मीडिया पोस्ट केली. दुपारी २.३० च्या दरम्यान राजाचा मृतदेह दरीत फेकण्यात आला. असा घटनाक्रम राजाच्या मृत्यू आधी घडला.

## संपादकीय

# 'मावशी'ची माघार

राष्ट्रभाषा हिंदीला विरोध म्हणजे देशद्रोह' अशा गर्जनांपासून सुरू झालेला पहिलीपासूनच्या हिंदीसक्तीचा प्रवास वळणावळणाने अखेर सपशेल माघारीवर येऊन थांबला आहे. गेल्या दोन महिन्यांत राज्य सरकारने यासंदर्भात अनेक कोलांटउड्या मारल्या, शाब्दिक खेळ केले आणि वकिली युक्तिवादही केले; मात्र विरोधात उभे राहू पाहणारे मराठीजनांचे बिगरराजकीय संघटन, ठाकरे बंधूंची मोर्चेबांधणी आणि मुख्य म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता विधिमंडळाच्या अधिवेशनापूर्वीच सरकारने शस्त्रे म्यान केली. पहिलीपासून त्रिभाषा धोरण राबविण्याचे म्हणजेच हिंदी सक्तीबाबतचे दोन्ही शासन निर्णय मागे घेण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करावी लागली. आता याबाबत तज्ज्ञांची समिती नियुक्त करून अहवाल आल्यानंतरच सरकार निर्णय घेणार आहे. हिंदी सक्तीला विरोध सुरू झाल्यानंतर लगेचच प्रतिष्ठेचा प्रश्न करून पोकळ समर्थनांचे फुगे उडवण्याऐवजी हा विषय तज्ज्ञांकडे सोपवला असता, तर आजची मुखभंगाची वेळ आली नसती. हिंदीच्या सक्तीच्या निमित्ताने मराठीजनांनी भाषेबाबत दाखविलेल्या एकजुटीचा हा विजय म्हणता येईल. राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा (एनईपी) हवाला देऊन हिंदीसक्ती रेटण्याच्या निर्णयाभोवती सुरुवातीपासूनच संशयाचे धुके निर्माण झाले होते. 'एनईपी'मधील त्रिभाषा सूत्रात 'पहिलीपासून' आणि 'हिंदी अनिवार्य' असे कोणतेही उल्लेख नसताना राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये हळूच या हिंदीसक्तीचा चंचूप्रवेश घडविण्यात आला. मराठी शाळांमध्ये पहिलीपासून मराठी आणि इंग्रजी या दोनच भाषा शिकवल्या जातात. इतर माध्यमांच्या शाळांमध्ये मात्र या दोन्ही भाषांसह त्या शाळेच्या माध्यमाची भाषाही शिकवली जाते; त्या पार्श्वभूमीवर मराठी शाळांमध्ये तिसरी हिंदी भाषा 'अनिवार्य' करण्याच्या १६ एप्रिलच्या 'शासन निर्णया'वरून समर्थन आणि विरोध असे 'हत्ती आणि चार आंधळ्यांचे आख्यान' महाराष्ट्रात सुरू झाले. सहावीपासून मुले हिंदी शिकतच आहेत; पहिलीपासून ते ओझे त्यांच्या डोक्यावर नको,' अशी पालक-शिक्षकांची अत्यंत साधी मागणी होती. मात्र, त्यावरून रण माजले. 'हिंदीला विरोध म्हणजे देशद्रोह' असे युक्तिवाद झाले. 'हिंदी विरुद्ध मराठी' असे चित्र रंगवून झाले आणि नेत्यांची मुले कोणत्या शाळेत शिकतात, याचेही उत्खनन झाले. त्यामुळे हा विषय भाषिक अस्मितेच्या मार्गाने निवडणुकीच्या आखाड्यात आला. प्रारंभी वीस विद्यार्थ्यांच्या किमान अटीवर अन्य भाषा शिकण्याचे स्वातंत्र्य देण्याची तयारी दर्शवून हिंदीसक्ती रद्द केल्याचे भासवण्याचा प्रयत्न झाला; पण ही मागच्या दाराने हिंदीसक्तीच असल्याने विरोधाची धार तीव्र झाली. नंतर हिंदीचे मौखिक शिक्षण देण्यातून एक पाऊल मागे घेण्याचाही प्रयत्न झाला. अखेरीस मुदत नसलेल्या तज्ज्ञ समितीकडे पाठवून हा विषय थंड्या बस्त्यात गेला. या दोन महिन्यांच्या मंथनातून अनेकांनी राजकारण साधण्याचा प्रयत्न केला. शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला एकत्र येण्यासाठी या मुद्द्यातून औचित्य लाभले. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हेसुद्धा या विरोधवारीत सहभागी झाले. मुंबई निवडणुकीत 'मराठी विरुद्ध परप्रांतीय' अशी पटकथा रंगवण्याचा आणि त्यातून कोणाचा फायदा होणार, याबाबत निष्कर्ष काढण्याचाही प्रयत्न अनेकांनी सुरू केला. नव्या राजकीय खेळात आपली कोंडी होत आहे, हे लक्षात आल्यानंतर पूर्वीपासून या निर्णयाचे समर्थन करणारे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या शिवसेनेने मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयास विरोध करून मराठीप्रेमाचा राग आळवला. माघार जाहीर करताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'मूळ निर्णय उद्धव ठाकरे यांचाच,' असा आरोप केला. सध्यापुरता हा वाद शमला असला, तरी काही मूलभूत प्रश्न अनुत्तरित आहेत. त्यामध्ये त्रिभाषा सूत्रावर अभिनिवेशविरहित मंथनाची गरज पुढे आली आहे. दक्षिणेतील राज्यांमध्ये उभ्या राहिलेल्या वादातून तिसऱ्या भाषेची सक्ती करण्यास सर्वोच्च न्यायालयानेही नुकताच स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. दुसरीकडे पहिलीपासून हिंदीचे अध्यापन रद्द झाल्यानंतर मराठी माध्यमाच्या, म्हणजे राज्यातील ८० टक्के विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत पुरेसे श्रेयांक (क्रेडिट) मिळविण्यासाठी काय मार्ग काढता येईल, याचा विचार तज्ज्ञांनी केला पाहिजे.

# सोन्याच्या दागिन्यांनी घात केला, अनैतिक संबंधाचेही कनेक्शन, महिलेच्या खुनाचे गूढ उलगडले

**स्वर्णभूमी न्यूज**

जळगाव : जळगावच्या पारोळा तालुक्यातील सुमठाणे येथील जंगलात २५ जून रोजी सापडलेल्या महिलेच्या खून प्रकरणाचा छडा स्थानिक गुन्हे शाखा आणि पारोळा पोलिसांनी लावला आहे. या प्रकरणी अनिल गोविंदा संदनशिव (रा. सुमठाणे) याला अटक करण्यात आली असून, त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

मृत महिलेची ओळख शोभाबाई रघुनाथ कोळी (वय ४८, रा. उंदीरखेडे) अशी पटली आहे. सोन्याच्या दागिन्यांसाठी आणि अनैतिक संबंधातून खून केल्याचा प्राथमिक संशय आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जळगावच्या पारोळा तालुक्यातील सुमठाणे गावाजवळील सामाजिक वनीकरणाच्या जंगलात आढळलेल्या महिलेच्या खूनप्रकरणाचा पर्दाफाश करत पोलिसांनी एका संशयितास अटक केली आहे. शोभाबाई रघुनाथ कोळी (वय ४८, रा. उंदीरखेडा) या महिलेला जंगलात नेऊन दगडाने ठेचून हत्या करण्यात आली, अशी कबुली अटकेत असलेल्या अनिल गोविंदा संदानशिव याने दिली आहे. दरम्यान सोन्याच्या दागिन्यांच्या लालसेपोटी आणि अनैतिक संबंधातून हा खून करण्यात आल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

२५ जून रोजी सायंकाळच्या सुमारास सुमठाणे शिवारातील जंगलात काही युवकांना बकऱ्या चारत असताना एका महिलेचा मृतदेह गोणीत भरलेल्या अवस्थेत आढळून आला. तिचे हातपाय बांधलेले होते. या प्रकरणी पारोळा पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपासाला सुरुवात केली. मृतदेहाची ओळख न पटल्याने तपासात अडथळे येत होते. पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या निर्देशानुसार विशेष पथक स्थापन करण्यात आले. तांत्रिक विषण, सीडीआर तपास आणि स्थानिक माहितीच्या आधारे मृतदेह उंदीरखेडा येथील शोभाबाई कोळी यांचा असल्याचे निष्पन्न झाले. तपासात अनिल संदानशिव हा आरोपी महिलेच्या संपर्कात असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी त्याला २८ जून रोजी रात्री धुळे जिल्ह्यातील एका गावातून ताब्यात घेतले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. शोभाबाई कोळी या पारोळा शहरात धुणी-भांडी करून उपजीविका चालवत होत्या. त्या नेहमीच सोन्याचे दागिने घालत असत. आरोपी अनिलचा तिच्या कुटुंबाशी पूर्वीपासून संपर्क होता. याचा गैरफायदा घेत त्याने विश्वास संपादन केला व त्यानंतर जंगलात नेऊन दगडाने ठेचून हत्या केली. नंतर तिचे दागिने चोरून पळ काढला. दरम्यान, मृत महिलेचा पती मुलाच्या आजारपणामुळे अंकलेश्वर येथे गेला होता. त्यांना दोन मुले असून, एक मुलगा अंकलेश्वर येथे नोकरीस आहे, तर दुसरा पारोळा येथे अॅल्युमिनियम सेक्शनमध्ये काम करतो.

सध्या पारोळा पोलिस आरोपीची अधिक चौकशी करत असून, गुन्ह्यात आणखी कुणाचा सहभाग आहे का, याचा शोध घेत आहेत.

# पोटच्या मुलीची डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घालून हत्या

**स्वर्णभूमी न्यूज**

धाराशिव : अवघ्या १० वर्षांची निरागस मुलीच्या डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घालून जन्मदात्या पित्यानेच आपल्या लेकराचा जीव घेतल्याची घटना घडली आहे. दारूच्या आहारी गेलेल्या बापाने हे राक्षसी कृत्य केले. त्या आरोपी बापाला पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्याला तीन दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

हत्या झालेल्या मुलीचे नाव गौरी असून ती वडिलांना दारूचे व्यसन लागल्यामुळे आपल्या आजीकडे राहत होती. आजी घरी नसताना पित्यानेच कुऱ्हाडीचे घाव घालून लहानग्या गौरीवर कुऱ्हाडीने हल्ला केला. या हल्ल्यातच गौरी मृत पावली. रविवारी रात्रीची ही घटना आहे.

गौरी वारंवार आजारी पडत असल्याचे कारण सांगत त्यामुळेच तिचा खून केला, असे आरोपीने सांगितले. गौरी जाधव ही गावातील शाळेत इयत्ता चौथीत शिक्षण घेत होती. हत्या केल्यानंतर आरोपी बापाने पुरावे नष्ट करण्याचा देखील प्रयत्न केला होता पण आजीच्या सतर्कतेमुळे सत्य बाहेर आले. आंबी पोलिसांनी आरोपी ज्ञानेश्वर जाधव याला अटक करत न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला तीन दिवसांची कोठडी सुनावली आहे. पोलीस ठाणे आंबी, तालुका भूम हद्दीतील मौजे शेळगावमधील आरोपी नामे ज्ञानेश्वर जाधव याने त्याची मुलगी गौरी जाधव (वय ९) हिचा खून केला. गौरी सारखी आजारी पडते तसेच आत्ता ती सायकलवरून पडल्याच्या कारणावरून रागाच्या भरात खून केल्याचे आरोपी बापाने सांगितले आहे. गौरी रविवारी रात्री घरात झोपली होती. त्यावेळी रागाच्या भरात बापाने तिच्या डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घालून तिची हत्या केली. सदर घटनेची माहिती मिळाल्यानंतर आम्ही तत्काळ घटनास्थळी जाऊन आरोपीला ताब्यात घेतले आहे, असे आंबीच्या पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. गुन्ह्याचा पुढील तपास आंबी पोलीस करीत आहेत.

# पंढरपूरला वारीसाठी निघालेल्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**स्वर्णभूमी न्यूज**

पुणे : सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून पंढरपूरला देवर्शनासाठी निघालेल्या चारचाकी गाडीतील एका अल्पवयीन मुलीला दुचाकीवरून आलेल्या दोघा अज्ञात व्यक्तींनी गळ्याला कोयता लावून फरडफडत नेऊन तिच्यावर अत्याचार केला. तसेच इतर महिलांच्या गळ्यातील दीड लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने लुटून पसार झाले. या घटनेमुळं दौंड हादरलं आहे. देवदर्शनासाठी जाणारे हे लोक चहा पिण्यासाठी थांबले असताना ही धक्कादायक घटना घडल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी दिली. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (३० जून) रोजी काहीजणं पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून चारचाकीनं पंढरपूरला देवदर्शनासाठी जात होते.

पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत गाडीतील लोक चहा पिण्यासाठी थांबले होते. यावेळी दोन अज्ञात व्यक्ती याठिकाणी दुचाकीवरून आले. त्यांनी कोयत्याचा धाक दाखवून,

# ठाकरे बंधू एकत्र आल्यास काँग्रेस स्वबळावर लढणार?

**स्वर्णभूमी न्यूज**

मुंबई : मुंबई महापालिकेपूर्वी ठाकरे बंधू एकत्र येण्यासंदर्भात जोरदार चर्चा असतानाच दुसरीकडे महाविकास आघाडीत मात्र फूट पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधू एकत्र आले तर काँग्रेस स्वबळावर लढणार असे संकेत काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिली. राज ठाकरेंची भूमिका अमान्य असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. या संदर्भात ७ जुलै रोजी मुंबईतील बैठकीत निर्णय होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

महाराष्ट्रातील आगामी स्थानिक संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात दिल्लीमध्ये काँग्रेसची एक बैठक पार पडली. त्यामध्ये दोन्ही ठाकरे बंधूंच्या निर्णयावरही चर्चा झाली. जर दोन्ही ठाकरे एकत्र आले तर महाविकास आघाडीमध्ये राहून एकत्र निवडणूक लढवायची की स्वबळावर लढायचं यावरही चर्चा झाल्याची माहिती आहे.

**राज ठाकरेंची भूमिका काँग्रेसला अमान्य**

राज ठाकरेंची उत्तर भारत आणि दक्षिण भारत ही भूमिका मान्य नसून भारत एक असल्याचं रमेश चेन्नीथला यांनी सांगितलं. सर्व ठिकाणी उमेदवार उभे करा अशी मागणी कार्यकर्त्यांची आहे. पण पक्षाला निर्णय घ्यायचा आहे असं रमेश चेन्नीथला म्हणाले. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र आल्यास काँग्रेस स्वबळाचा नारा देणार का हे पाहणं महत्त्वाचं आहे.

**ठाकरे बंधूंची जवळीकता, काँग्रेसमध्ये अस्वस्थता**

आगामी महापालिका निवडणुकांच्या तोंडावर उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसे यांच्यामधली जवळीक वाढत असल्याचं चित्र आहे. त्यामुळं महाविकास आघाडीतल्या काँग्रेस पक्षात अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर मुंबई



महापालिकेच्या आगामी निवडणुकीत स्वबळावर लढण्याविषयीचा एक मतप्रवाह काँग्रेसमध्ये निर्माण झाला आहे.

**७ जुलैच्या बैठकीत निर्णय होणार**

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या नेतृत्त्वाखाली महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांची एक बैठक सोमवारी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात पार पडली. मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढायची की एकत्र या मुद्द्यावर या बैठकीत चर्चा झाली. त्याविषयी प्रश्न विचारलं असता, मुंबई महापालिकेत काँग्रेस स्वबळावर लढणार का याचा निर्णय ७ जुलैला होईल असं चेन्निथला यांनी स्पष्ट केलं. यासंदर्भात पक्षश्रेष्ठींशीही चर्चा करू, असं त्यांनी स्पष्ट केलं. काँग्रेसच्या राजकीय घडामोडींविषयी समितीची मुंबईत बैठक होणार असून, त्या बैठकीसाठी चेन्निथला पुन्हा मुंबईत येणार आहेत.

**काँग्रेसला राज ठाकरे का नकोत?**

राज ठाकरेंनी गेल्या काही वर्षात हिंदुत्त्ववादी भूमिका घेतली आहे. माहीमची समुद्रातील अनधिकृत मजार हटवणे, मशिदीवरील भोंगे उतरवणे असे विषय अजेंड्यावर घेतले. तर उद्धव ठाकरेंना लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर मुस्लीम मतं मिळाली होती. मुंबईतील भायखळा, मुंबादेवी, अणुशक्तीनगर, मानखुर्द, कुर्ला, चांदिवली आणि मालाड मालवणी या भागातील मुस्लिम मतं मोठ्या प्रमाणात ठाकरेंच्या शिवसेनेकडं वळली होती. राज ठाकरेंमुळं ही मतं दूर जाण्याची काँग्रेसला भीती वाटत असल्याची चर्चा आहे.

# तेलंगाणामध्ये भाजपाला खिंडार! नवीन अध्यक्षपदाच्या वादात आमदार राजासिंह यांचा राजीनामा

स्वर्णभूमी न्यूज

हैदराबाद : गोशामहलचे आमदार राजासिंह यांनी भाजपाचा राजीनामा दिला आहे. पक्षाध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापासून रोखण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी राजीनामा देत असल्याचं स्पष्ट केलं. त्यांनी सांगितलं की, त्यांनी आपला राजीनामा प्रदेशाध्यक्ष किशन रेड्डी यांना पाठवला आहे.

तेलंगाणामध्ये पक्षाध्यक्षाच्या नियुक्तीबाबत आमदार राजासिंह यांनी आज सकाळी खळबळजनक भाष्य केलं. ते म्हणाले की, असा प्रचार सुरू आहे की, हायकमांडने प्रदेशाध्यक्ष म्हणून एका व्यक्तीबाबतचा निर्णय घेतला आहे. तसंच बूथ कार्यकर्त्यांपासून ते प्रमुख नेत्यांपर्यंतच्या मतदानाने अध्यक्ष निवडला पाहिजे. तेलंगाणामध्ये भाजपा सत्तेत यायची असेल तर निवडणुका घ्याव्यात अशी मागणी त्यांनी केली.

राजासिंह यांनी आरोप केला की, ते दुपारी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी गेले होते आणि अर्जही घेतला होता. परंतु राष्ट्रीय परिषदेच्या सदस्यांनी त्यांना पाठिंबा न देण्याची धमकी दिली होती. ते म्हणाले, ''त्यांनी मला इशारा दिला की, मी पक्षात राहावे की बाहेर पडावे. माझ्या अर्जावर तीन सदस्यांनी स्वाक्षरी केली. आणखी सात सदस्यांच्या सह्या आवश्यक आहेत. यामुळे, मी माझा उमेदवारी अर्ज दाखल करू शकलो नाही. मी किशन रेड्डी यांना माझा राजीनामा स्वीकारण्यास सांगितले. मी किशन रेड्डी यांना सांगितले की ते सभापतींना राजासिंग यांना निलंबित करण्यास सांगा, ते आमचे आमदार नाहीत.'' तसंच आपल्याला २०१४ पासून पक्षात अडचणी येत आहेत असंही आमदार राजासिंग यांनी सांगितलं.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे, तेलंगाणा भाजपाचे नवे अध्यक्ष म्हणून माजी विधानपरिषद सदस्य रामचंद्र राव यांचं नाव आज जवळजवळ निश्चित झालं आहे. त्यांनी आज दुपारी अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. अद्याप कोणीही रिंगणात नसल्याने त्यांची निवड एकमताने होण्याची शक्यता आहे.

# ठाकरेंचे मराठी प्रेम बेगडी, मग मुलांना इंग्रजी माध्यमात का शिकवले? नारायण राणेंचा सवाल

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई : रविवारी देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रिमंडळाने पहिल्या इयत्तेतून हिंदी भाषेच्या सक्तीविरोधातील वाढत्या निषेधाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील शाळांमधील 'त्रिभाषा' धोरणावरील सरकारचा आदेश रद्द केलाय. त्यानंतर आता उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंनी विजयी रॅली काढणार असल्याचे सांगितलेय. खरे तर उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरेंनी एकत्रित मिळून ५ जुलै रोजी महायुती सरकारच्या हिंदी भाषेच्या सक्तीच्या निर्णयाच्या विरोधात मोठा मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. ज्यामध्ये काँग्रेस, शरद पवार यांचा राष्ट्रवादी आणि इतर मराठी भाषिक पक्ष सहभागी होणार होते. आता सरकारने हा आदेश रद्द केल्यानंतर ठाकरे बंधू पुन्हा एकत्र येणार का? अशी दबक्या आवाजात चर्चा सुरू असतानाच माजी केंद्रीय मंत्री आणि सिंधुदुर्ग-रत्नागिरीचे खासदार नारायण राणेंनी थेट उद्धव ठाकरेंवर प्रहार केलाय.

मराठी माणसाच्या आणि मराठी भाषकांच्या कल्याणाचे काय? : उद्धव ठाकरे यांचे मराठीचे प्रेम बेगडी आहे. मराठीबद्दल इतकेच प्रेम होते तर मुलांना इंग्रजी माध्यमात का शिकवले? असं म्हणत त्यांनी एक्सवरून उद्धव ठाकरेंवर टीकास्त्र डागलेय. उद्धव ठाकरे यांचे मराठीचे प्रेम बेगडी, राजकीय आणि स्वार्थापोटी आहे.



मुख्यमंत्री असताना हे प्रेम कुठे गेले होते? मराठी माणसाच्या नोकरी, धंदा आणि पोटाच्या प्रश्नासाठी काय केले? मराठीच्या नावावर केवळ आपले कल्याण करून घेतले. मराठी माणसाच्या आणि मराठी भाषकांच्या कल्याणाचे काय? महाराष्ट्राची राजधानी मुंबईमध्ये मराठी माणसाची टक्केवारी १८ टक्क्यांपर्यंत खाली आली, याला जबाबदार कोण? मराठीबद्दल इतकेच प्रेम होते तर मुलांना इंग्रजी माध्यमात का शिकवले? सरकारने दोन जीआर रद्द केले म्हणून विजयी मेळावा काढणे म्हणजे नाचता येईना अंगण वाकडे असेच म्हणावे लागेल, असं म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केलाय.

माशेलकरांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती : त्रिभाषेचा निर्णय उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री असताना झाल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता, त्यावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, ''मुख्यमंत्रिपदाच्या काळात नवीन शिक्षण धोरण जाहीर झाल्यानंतर प्रसिद्ध शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. त्यांचा अहवाल आल्यानंतर त्यावर एक अभ्यासगट नियुक्त केला. पण त्या अभ्यासगटाची एकही बैठक झाली नाही. पण त्यानंतर सरकार पडलं. त्यामुळेच भाजपाकडून खोटेपणा पसरवला जात आहे.''

मार्क मिळाले १०० पैकी १०० कमळी आमची एक नंबर : पहिले मराठी विरुद्ध अमराठी करायचं, मराठी भाषिकांमध्ये फूट पाडायची. हे सरकारचं षडयंत्र आहे. मराठी माणसात वाद होत नाही. हे दिसल्यानंतर मराठी एकजूट होऊ नये, म्हणून त्यांनी हा जीआर मागं घेतला आहे. मार्क मिळाले १०० पैकी १०० कमळी आमची एक नंबर! ही कमळी कोणत्या शाळेत शिकली हे बघायला हवं. कमळीवर कोणत्या भाषेची सक्ती होती, हेदेखील पाहायला हवं की तिथेही ईव्हीएम मशीनचा वापर केला? हे पाहायला हवे, '' अशी टीका उद्धव ठाकरेंनी केलीय.

# कपडे वाळत टाकण्यासाठी दोरी बांधताना शॉक लागून वारकऱ्यांचा मृत्य

स्वर्णभूमी न्यूज

सातारा : आळंदीहून निघालेली माऊलींची पालखी रविवारी सातारा जिल्ह्यातील बरडमध्ये विसावली असताना कपडे वाळत टाकण्यासाठी दोरी बांधताना दोन वारकऱ्यांचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना रविवारी (२९ जून) सायंकाळी चारच्या सुमारास घडली. तुषार रामेश्वर बावनकुळे (रा. खलासना, नागपूर) आणि मधुकरराव तुकाराम शेंडे (रा. मेडिकल चौक, नागपूर), अशी मृत वारकऱ्यांची नावे आहेत.

नेमकं काय घडलं? : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा सातारा जिल्ह्यातील शेवटचा मुक्काम रविवार फलटण तालुक्यातील बरड येथे होता. बरड गावा-नजीकच्या टोलनाका येथे मुक्कामासाठी वारकरी तंबू उभारत होते. त्यावेळी तुषार बावनकुळे या वारकऱ्याचा लोखंडी रॉडला हात लागताच ते रॉडला चिकटले. त्यांना बाजूला करण्यासाठी गेल्यानंतर मधुकरराव शेंडेही चिकटले. दोघांनाही विजेचा जबर शॉक लागला. १०८ रुग्णवाहिकेला पाचारण करून तातडीने त्यांना नातेपुते येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, दोघांचाही मृत्यू झाल्याचं वैद्यकीय अधिकारी डॉ. नम्रता व्होरा यांनी सांगितलं.

दोन्ही वारकरी होते विठ्ठलभक्त : फलटण तालुक्यातील बरडजवळ रविवारी पालखीचा मुक्काम होता. शेंडे आणि बावनकुळे आपल्या तंबूत विश्रांती घेत होते. कपडे वाळत टाकण्यासाठी दोरी बांधत असताना बाजूच्या विजेच्या खांबातून जोरात शॉक लागल्याने दोघेही बेशुद्ध पडले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. मधुकर शेंडे आणि तुषार बावनकुळे हे निस्सीम विठ्ठलभक्त होते.

दुर्घटनांमुळं वारकऱ्यांवर शोककळा : आषाढी वारीच्या काळात यापूर्वी अनेक मोठ्या दुर्घटना घडल्या आहेत. रेल्वेतून पडल्याने आणि चंद्रभागा नदीत बुडाल्याने दोघांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, विजेचा धक्का लागून दोन वारकऱ्यांचा मृत्यू झाल्यानं संपूर्ण वारकऱ्यांवर शोककळा पसरली आहे. तसंच वारीच्या काळात हृदयविकाराच्या झटक्याने, अज्ञात वाहनाने धडक दिल्याने वारकऱ्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना यापूर्वी घडलेल्या आहेत.

# महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्य सचिवांच्या मुदतवाढीची चर्चा हवेतच, राजेशकुमार मीना नवे मुख्य सचिव

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या मुख्य सचिवपदी असलेल्या सुजाता सौनिक यांना मुदतवाढ मिळण्याच्या चर्चेनं जोर धरला होता. परंतु ती चर्चा आता हवेतच विरली आहे. कारण राज्याच्या मुख्य सचिवपदी राजेशकुमार मीना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते आज (३० जून) आपला पदभार सांभाळणार आहेत. सुजाता सौनिक आज महिन्याच्या अखेरीस सेवानिवृत्त झाल्यात. महसूल विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी कार्यरत असलेले ज्येष्ठ सनदी अधिकारी राजेशकुमार मीना यांची महाराष्ट्राचे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

सुजाता सौनिक कोण आहेत? : सुजाता सौनिक अत्यंत कडक शिस्तप्रिय महिला म्हणून ओळखल्या जातात. त्या राज्याच्या गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदाचा कार्यभार सांभाळत होत्या. त्यांना अलिकडेच सचिवपदी बढती देण्यात आली होती. त्यांनी सामान्य प्रशासन विभागात अतिरिक्त मुख्य सचिव म्हणूनही काम पाहिलंय. त्यांनी सार्वजनिक आरोग्यासह इतर काही विभागातही काम केलंय. सुजाता सौनिक यांना प्रशासकीय सेवेत तीन दशकांचा दांडगा अनुभव आहे. त्यांना आरोग्य सेवा, वित्त, शिक्षण, आपत्ती व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांमध्ये अनुभव आहे.



सुजाता यांचे पती मनोज सौनिक हे देखील राज्याचे मुख्य सचिव होते. यानंतर त्यांना मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार म्हणून नियुक्त करण्यात आले होते. मनोज सौनिक यांच्या निवृत्तीनंतर सरकारने १९८८ च्या बॅचचे आयएएस अधिकारी नितीन करीर यांची मुख्य सचिवपदी नियुक्ती केली होती.

राजेशकुमार मीना कोण आहेत? : राजेशकुमार मीना हे राजस्थानमधील सवाई माधोपूर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. ते सध्या महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून काम करीत आहेत. आतापर्यंत त्यांनी विविध विभागांमध्ये अनेक महत्त्वाची पदं भूषवली आहेत.

राजेश कुमार मीना यांचा कार्यकाळ : मीना हे १९८८ बॅचचे सनदी अधिकारी आहेत. ते ऑगस्ट २०२५ मध्ये सेवानिवृत्त होत आहेत. त्यामुळे मुख्य सचिव पदासाठी त्यांच्याकडे जुलै आणि ऑगस्ट असा दोन महिन्यांचाच कालावधी असणार आहे. पण जर मधल्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घोषित झाल्या मीना यांना मुख्य सचिव पदासाठी मुदतवाढ मिळू शकते, अशी शक्यता आहे. याआधी अजोय मेहता, नितीन करीर या दोन ज्येष्ठ माजी सनदी अधिकाऱ्यांना निवडणुकीच्या काळात राज्याच्या मुख्य सचिव पदावर मुदतवाढ मिळाली होती.

उत्तर प्रदेश केडरमधून कारकिर्दीला सुरुवात : १९८८ मध्ये यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ते आयएएस अधिकारी झाले. राजेश मीणा यांनी उत्तर प्रदेश कॅडरमधून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. ते माजी भाजपा खासदार जसकौर मीणा यांची मोठी मुलगी अर्चना मीणा यांचे पती आहेत. राजेश मीना यांचे वडील रामगोपाल मीणा हे सवाई माधोपूर पीजी कॉलेजचे प्राचार्य राहिले आहेत. त्यांच्या पत्नी अर्चना मीणा सामाजिक क्षेत्रात सक्रिय भूमिका बजावत आहेत.

# ''हिम्मत असेल तर ठाकरे बंधूंनी शेतकरी कर्ज माफीसाठी मोर्चा काढावा'',- सुधीर मुनगंटीवार

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई : राज्यातील त्रिभाषीय धोरण अर्थात हिंदी सक्तीबाबतचा जीआर राज्य सरकारने मागे घेतला आहे. याबाबत रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा केली. या घोषणानंतर मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाकडून राज्यात आनंद व्यक्त केला जात आहे. मराठी माणसाच्या दबावामुळं राज्य सरकार बॅकफूटवर गेलं आणि अध्यादेश रद्द केला. त्यामुळं हा मराठी माणसाचा विजय असल्याचं दोन्ही ठाकरे बंधूंनी म्हटलं आहे. तसंच, पाच जुलै रोजी होणारा सर्वपक्षीय मोर्चा टाळला असला तरी ५ जुलै रोजी विजय रॅली निघेल, असं शिवसेना ठाकरे गटाकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान, ''त्यांचा (मनसे-शिवसेना ठाकरे गट) मोर्चा निघणार म्हणून जर सरकारने अध्यादेश मागे घेतला असेल, तर दोन ठाकरे बंधूंनी शेतकरी कर्जमाफीसाठी हिम्मत असेल तर मोर्चा काढावा,'' असं म्हणत माजी मंत्री आणि भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना आव्हान दिले आहे.

केवळ हे निवडणुकीसाठी...: ''जेव्हा मराठीसोबत दुसरी भाषा म्हणून इंग्रजी सक्तीची केली, तेव्हा बाकीचे कुठे गेले होते. तेव्हा त्यांनी इंग्रजीलाही विरोध केला पाहिजे होता. पण तसं झालं नाही आणि आता केवळ आगामी पालिका निवडणुका डोळ्यासमोर



आहेत म्हणून हा मोर्चा आणि आवाज उठवला जातोय... यांचं राजकारण केलं जातंय,'' असा गंभीर आरोप सुधीर मुनगंटीवार यांनी ठाकरे बंधूंवर केला. याचबरोबर, ''जर आपण हिंदीला विरोध करतोय तर मग इंग्रजीलाही विरोध झाला पाहिजे. पण इंग्रजी आपण राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या काळात स्वीकारली आहे. त्यावेळी इंग्रजीला विरोध झाला नाही. मात्र आता हिंदीला विरोध होतोय.

हे केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केलेलं राजकारण आहे,'' असेही सुधीर मुनगंटीवार म्हणाले. मी कशाची पर्वा करत नाही...: ''मी नेहमीच सभागृह असो किंवा बाहेर सत्यासाठी लढलो आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी जरी सरकारनं शेतकरी कर्जमाफीचं आश्वासन दिलं असलं तरी...आणि मी सत्ताधारी पक्षाचा आमदार असलो तरी...सभागृहात शेतकरी कर्जमाफीबद्दल आवाज उठवला आहे. मी सत्यासाठी लढत राहणार, सत्य बोलण्यासाठी मी कशाची पर्वा करत नाही किंवा परिणामांचाही चिंता करत नाही. इथून पुढंही सत्यासाठी सभागृहात आवाज वाढवणार आहे,'' असे सुधीर मुनगंटीवार म्हणाले. दरम्यान, शक्तीपीठ महामार्गासाठी २०,००० कोटींचे राज्य सरकारने कर्ज काढले आहे. याबाबत राज्याच्या वित्त विभागाने चिंता व्यक्त केली आहे. यावर सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, ''मी याबाबत आकडेवारीचा अभ्यास करेन आणि त्यानंतरच वक्तव्य करेन.''

# ...तर त्यांनी कैलासाला जावे'; पाक अभिनेत्रीवरून ट्रोल होणाऱ्या दिलजीत दोसांझला नसीरुद्दीन शाहांचा पाठिंबा

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई,३० जून (पीएसआय)
लोकप्रिय अभिनेता आणि गायक दिलजीस दोसांझचा 'सरदार जी ३' हा चित्रपट भारता बाहेर प्रदर्शित झाला आहे. तर भारतात त्यावरून वाद निर्माण झाला आहे. त्याचे कारण म्हणजे या चित्रपटात पाकिस्तानी अभिनेत्री हानिया आमिर दिसली आहे. त्यामुळे या सगळ्यात बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते नसीरुद्दीन शाह यांनी दिलजीतला पाठिंबा दिला आहे. फक्त इतकेच नाही तर त्यांनी दिलजीतवर निशाणा साधणाऱ्या लोकांवर देखील आक्षेप घेतला आहे. त्यासोबत भारत आणि पाकिस्तानमध्ये चांगले संबंध ठेवण्यावर देखील जोर दिला आहे.

नसीरुद्दीन शाह यांच्याविषयी बोलायचे झाले तर दिग्गज अभिनेता नसीरुद्दीन शाह यांनी त्यांच्या फेसबूक अकाऊंटवरून एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी दिलजीत दोसांझला पाठिंबा दिला आहे. त्याशिवाय ज्यांनी दिलजीतला ट्रोल केले आहे त्यांच्यावर संताप व्यक्त केला आहे.

नसीरुद्दीन शाह यांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की 'मी दिलजीतसोबत आहे. जुमला पार्टीच्या या घाणेरड्या ट्रिक्स डिपार्टमेंट त्याच्यावर कसा हल्ला करता येईल त्याची संधी शोधत आहेत. त्यांना वाटतं की अखेर त्यांना संधी मिळालीच. चित्रपटाच्या कास्टिंगसाठी तो जबाबदार नाही. तर दिग्दर्शक आहे. पण कोणाला माहित नाही की तो कोण आहे, तर दिलजीतला संपूर्ण जग ओळखतं आणि त्यांनी कास्टिंगसाठी त्यामुळेच होकार दिला असेल. कारण त्याच्या डोक्यात अशा कोणत्याही प्रकारचं विष नाही. हे गुंड भारत आणि पाकिस्तानच्या लोकांमध्ये असलेल्या गोष्टी संपवण्याचा प्रयत्न करत आहेत.'

पुढे ते म्हणाले की, 'तिथे माझे काही जवळचे नातेवाईक आणि काही चांगले मित्र आहेत. जेव्हा केव्हा माझी इच्छा होते, तेव्हा मी त्यांना भेटण्यासाठी किंवा त्यांच्यावर प्रेम व्यक्त करण्यापासून कोणी थांबवू शकत नाही. तर जे लोक म्हणतील - पाकिस्तानला जा, त्यांच्यासाठी माझं उत्तर आहे - कैलासला जा.'

# २५ कोटींची नोटीस, मोठा वाद अन् आता परेश रावल यांचे 'हेरा फेरी ३' मध्ये कमबॅक

स्वर्णभूमी न्यूज





मुंबई : 'हेरा फेरी' फ्रेंचायझीमधील परेश रावल यांची बाबू भैय्याची भूमिका ही आयकॉनिक आहे. मात्र, चाहत्यांना धक्का तेव्हा बसला जेव्हा ही माहिती समोर आली की परेश रावल हे 'हेरा फेरी ३' मध्ये दिसणार नाही. त्यानंतर खूप मोठा वाद सुरु झाला होता. चाहते सतत सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना चित्रपटात येण्याची विनंती करत होते. आता अशी माहिती समोर आली आहे की जो वाद होता, तो संपला असून परेश रावल यांनी या चित्रपटात कमबॅक केलं आहे.

परेश रावल यांनी स्वत: कंफर्म केलं हे की जी काही माहिती होती. जो काही वाद होता तो संपला आहे आणि ते आता कमबॅक करणार आहेत. 'द हिमांशु मेहता शो' नावाच्या एका युट्यूब चॅनलला दिलेल्या एका मुलाखतीत परेश रावल यांना विचारण्यात आलं की नेमकी कॉन्ट्रॉवर्सी काय होती? त्यावर उत्तर देत परेश रावल म्हणाले, 'कॉन्ट्रोव्हर्सी काही नाही. माझं हेच आहे की जेव्हा काही गोष्टी लोकांना इतक्या आवडतात तेव्हा त्यांना काळजी करण्याची गरज असते.'

'हेरा फेरी ३' मध्ये कमबॅक करण्यावर परेश रावल यांनी म्हटलं की 'प्रेक्षकांसाठी आपली एक जबाबदारी आहे, कारण प्रेक्षक बसले आहेत. ते आपल्यावर इतकं प्रेम करतात. त्यामुळे प्रेक्षकांना ग्राह्य धरू शकत नाही. मेहनत करा. तर माझं म्हणणं तेच आहे की सगळ्यांना एकत्र या, मेहनत करा, त्यापलीकडे जाऊन दुसरं काही नको.'

पुढे जेव्हा परेश रावल यांना विचारण्यात आलं तेव्हा त्यांनी सांगितलं की 'आधी देखील येणारच होते, पण काय आहे की एकमेकांना फाइन ट्यून करणं गरजेचं आहे. सगळ्यात आधी क्रिएिव्ह लोक आहेत. प्रियदर्शन आहे, अक्षय आहे किंवा सुनील आहे, सगळे अनेक वर्षांपासू मित्र आहेत.'

काय होता वाद?

परेश रावल यांनी चित्रपट सोडल्यानंतर अक्षय कुमारची कंपनी केप गुड फिल्मसनं परेश रावल यांना लीगल नोटिस पाठवत २५ कोटी मागितले होते. त्यावर परेश रावल यांनी उत्तर दिलं की इकडे चित्रपटाची स्क्रिप्ट देखील आली नाहीये तर पैसे देण्याचा प्रश्नच येत नाही. परेश रावल यांना सायनिंग अमाऊंट म्हणून ११ लाख रुपये मिळाले होते. तर त्यांनी ते पैसे व्याजासकट परत दिले. या प्रकरणाला घेऊन चांगलाच वाद पेटला होता. परेश रावल यांचे वकीलांनी सांगितलं की त्यांचे क्लायंटनं हा चित्रपट यासाठी सोडला की त्यांना या चित्रपटासंबंधी काही महत्त्वाच्या गोष्टी अर्थात स्क्रिप्ट किंवा अग्रीमेंट ड्राफ्ट मिळालेलं नाही. दरम्यान, या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाची प्रेक्षक आतुरतेने प्रतीक्षा करत आहेत.

# उद्धव ठाकरेंचे वक्तव्य; ''कुठलीही समिती नेमा, महाराष्ट्रात आता हिंदीष्ठ.''

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई : हिंदी सक्तीबाबतचे दोन्ही अध्यादेश सरकारने रद्द केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. त्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. जय महाराष्ट्रचा नारा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात बुलंद झाला असं उद्धव ठाकरे यांनी पुन्हा म्हटलं आहे. तसंच भाजपावर जोरदार टीकाही केली आहे. उद्धव ठाकरे यांनी नेमकं काय म्हटलं आहे? संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जय महाराष्ट्र हा नारा बुलंद झाला. हा नार बुलंद करण्यामागे शिवसेना आणि शिवसैनिक तर होतेच मात्र ज्या ज्या राजकीय पक्षांनी ज्या ज्या मराठी भाषिकांनी पक्षभेद विसरुन सहभाग घेतला त्यांना सगळ्यांना मी धन्यवाद देतो आहे. सरकारला शहाणपण सुचलं आहे की नाही? हे येत्या काही दिवसांत समजेलच, पण हिंदी सक्तीचा जीआर सध्या रद्द केला आहे. जर सरकारने तो रद्द केला नसता तर ५ जुलैच्या मोर्चात भाजपामधले, एसंशि गटातले, अजित पवार गटातले मराठी प्रेमी सहभागी होणार होते आणि होणारही आहेत असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे. मातृभाषेचं प्रेम पक्षाच्या पलिकडे असलं पाहिजे.

सरकारने एक समिती नेमली आहे त्यात समितीत नरेंद्र जाधव यांच्या पांडित्याचा आणि बुद्धिमत्तेचा आदर करुन मी हे सांगतो आहे की तुम्ही अशी थट्टा करु नका. कारण हा शिक्षणाचा विषय आहे. शिक्षण विषयात तुम्ही अर्थतज्ज्ञांची समिती नेमली आहे. समिती कुठलीही असूदेत पण सक्ती हा विषय आता संपला आहे. महाराष्ट्रावर हिंदी सक्ती आता होऊ शकत नाही. असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

५ जुलैला विजयी मेळावा किंवा मोर्चा काय ते मी दोन ते तीन दिवसांत सांगतो. मराठी द्रोही जे डोकं वर काढतात ते आपण चेपलं आहे. पण आपल्या एकजुटीसाठी संकटाची वाट न पाहता ती अशीच कायम ठेवू म्हणजे असे लोक पुन्हा फणा वर काढणार नाहीत. ५ जुलैला विजयी उत्सव साजरा होणार आहे. मराठी माणसाची एकजूटच तुम्हाला त्या वेळी पाहण्यास मिळेल. मराठी आणि अमराठी वाद सरकारला घडवून आणायचा होता. मात्र त्यात त्यांना यश आलेलं नाही, त्यामुळे

# अजितदादांच्या अर्थसंकल्पाची जयंतरावांकडून चिरफाड, कागदावर आकडे पण खर्चच होत नाही, धक्कादायक वास्तव?

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई : महसुली तूट सातत्याने वाढत असल्याने राज्यावरील कर्जाचा बोजा वाढतो आहे. त्यामुळे अनुसूचित जाती आणि जमातीवर खर्च होणारा निधी केवळ कागदावर दाखवला जातो मात्र पैसा खर्चच होत नाही, असे धक्कादायक दावा करीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्या अर्थसंकल्पाची चिरफाड केली आहे.

: महसुली तूट सातत्याने वाढत असल्याने राज्यावरील कर्जाचा बोजा वाढतो आहे. त्यामुळे अनुसूचित जाती आणि जमातीवर खर्च होणारा निधी केवळ कागदावर दाखवला जातो मात्र पैसा खर्चच होत नाही, असे धक्कादायक दावा करीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी अर्थमंत्री अजित पवार यांच्या अर्थसंकल्पाची चिरफाड केली आहे.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. हा निधी राज्यातील रस्ते, मेट्रो, सिंचन योजनांसारख्या पायाभूत प्रकल्पांसाठी, तसेच नाशिकमधील सिंहस्थ कुंभमेळ्याचे नियोजन, महात्मा ज्योतीराव फुले आरोग्य योजना, संजय गांधी निर-ाधार अनुदान योजना, मागास विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच दुर्बल, वंचित समाजघटकांच्या विकासासाठी उपयोगात आणण्यात येणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. परंतु अर्थमंर्त्यांच्या घोषणेत आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत मोठा घोळ असल्याचा दावा जयंत पाटील यांनी केला आहे. जयंत पाटील म्हणाले, ''चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केला असा उल्लेख मी मागील वेळी केला होता. त्यावेळी महसुली तूट ही ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची होती. आज राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी पुन्हा पुरवणी मागण्या मांडल्या. त्या ५७ हजार ५०९ कोटीच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्याने या पुरवणी मागण्या मंजूर होतीलच. त्यावेळी सरकारला १ लाख ३ हजार ४०० कोटी रुपये कमी पडणार आहेत. पूर्वीच्या



आणि आताच्या पुरवणी मागण्या मिळून सरकारने अजून एक नवा विक्रम रचला आहे''.

''याचा अर्थ सरळ आहे, पुरवणी मागण्या समोर मांडायच्या आणि ते पैसे खर्च करायचे नाही. यापुढे हिवाळी अधिवेशन देखील येणार. पुढचा अर्थसंकल्प मांडण्याच्या आधी एक पुरवणी मागणी येणार. म्हणजे राज्याची महसूली तूट हे दीड किंवा दोन लाख कोटींपर्यंत पोहोचव-तील. याचा अर्थ असा की, सरकारला सर्व आकडे कागदावर दाखवणे आवश्यक आहे. नाहीतर ज्यांच्याकडून पैसे घेतले आहेत किंवा ज्यांचे देणं बाकी आहे असे लोकं एकतर आत्महत्या करतील अन्यथा यांच्या मागे लागतील. म्हणून सरकारने राज्याच्या अर्थकारणामध्ये एवढ्या मोठ्या तुटीपर्यंत पोहोचण्याचे धाडस केले आहे'', असे जयंत पाटील म्हणाले. सरकारला आता अर्थसंकल्पाचे संतुलन टिकवणे अवघड झाले आहे. त्यामुळे नाईलाजाने राज्यावरील बोजा वाढला आहे. आर्थिक संतुलन ढासळले आहे. यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होतो आहे.

# अंबादास दानवेंनी चंद्रशेखर बावनकुळेंना घातली टोपी; विरोधकांची एकच घोषणाबाजी

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई : पावसाळी अधिवेशनाचा आज पहिला दिवस. आजच्या पहिल्या दिवशी विधानसभेत केवळ २६ मिनिटांचं कामकाज झालं. यावेळी शोक प्रस्ताव आणि पुरवण्या मागण्या सादर करण्यात आल्या. यानंतर दिवसभरासाठी दोन्ही सभागृहातील कामकाज तहकूब करण्यात आलं. मात्र सभागृह सुरू होण्याच्या अगोदर विधानभवनाच्या पायऱ्यावर विरोधकांनी सरकारच्या विरोधात आंदोलन केलं.

चंद्रशेखर बावनकुळेंना टोपी घातली : राज्यातील विविध मुद्द्यावरून विरोधकांनी आंदोलन केलं. त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत अभिवादन केलं. यावेळी विरोधकांनी ''मी मराठी'', असं लिहिलेली सफेद रंगाची टोपी परिधान केली होती. दरम्यान, विधान भवनाच्या परिसरातून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे जात होते. त्यावेळी त्यांना ''टोपी घाला...टोपी घाला...'' असं विरोधकांनी म्हटलं. चंद्रशेखर बावनकुळे हे टोपी घालण्यास मनाई करत असतानाही विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी त्यांना टोपी घातली.

विरोधकांची घोषणाबाजी : मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी टोपी घातल्यानंतर, ''छत्रपती शिवाजी महाराज की जय..., मराठी माणसांच्या एकजुटीचा विजय असो... , जय





भवानी... जय शिवाजी...'' अशी घोषणाबाजी करत विरोधकांनी विधान भवनाचा परिसर दणाणून सोडला. मात्र, चंद्रशेखर बावनकुळे यांनी ''मी मराठी'' नावाची घातलेली टोपी काही वेळातच डोक्यावरून काढली आणि तिथून ते निघून गेले. मात्र, चंद्रशेखर बावनकुळे यांना अंबादास दानवे यांनी घातलेले टोपी आणि विरोधकांची घोषणा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

५७ हजार ५०९ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर : पावसाळी अधिवेशन १८ जुलैपर्यंत चालणार आहे. या अधिवेशनाच्या आजच्या पहिल्या दिवशी विरोधकांनी राज्यातील विविध प्रश्नावरुन विधान भवनाच्या पायऱ्यावर आंदोलन केलं. तर विधानसभेत केवळ २६ मिनिटांचं कामकाज चाललं. त्यानंतर दिवसभरासाठी सभागृहाचं कामकाज तहकूब करण्यात आलं.

या कामकाजात चार अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आणि शोक प्रस्ताव मांडण्यात आला. तर दुसरीकडं राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी ७१ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहात सादर केल्या.

# यश दयालने माझे लैंगिक शोषण केले, पैसेही घेतले; महिलेच्या आरोपाने क्रीडाविश्वात खळबळ

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई : आयपीएलमधून प्रसिद्ध झालेला भारतीय क्रिकेटपटू यश दयाल एका मोठ्या वादात अडकला आहे. अलिकडेच आयपीएल २०२५ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला चॅम्पियन बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या यश दयालवर एका महिलेने लैंगिक शोषण, हिंसाचार आणि फसवणूकीचा आरोप केला आहे. पीडित महिलेने सोशल मीडियावर पोस्टद्वारे यश दयालवर कारवाईची मागणी केली आहे.



लग्नाच्या बहाण्याने मानसिक आणि शारीरिक शोषण केल्याचा आरोप एका महिलेने यश दयालवर केला आहे.

गाझियाबाद येथील रहिवासी असलेल्या महिलेने पीएम ऑनलाइन तक्रार पोर्टलवर हा गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर पोलीस कारवाईत आले आहेत. वृत्तानुसार, इंदिरापुरमच्या सर्कल ऑफिसरने या प्रकरणाशी संबंधित अहवाल मागितला आहे. पीडित महिलेने या प्रकरणात न्यायासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि राज्य पोलिसांकडे मागणी केली आहे.

१४ जून २०२५ रोजी महिला हेल्पलाइनवर सदर महिलेने तक्रार दाखल केली आहे. सदर महिला म्हणाली की, गेल्या पाच वर्षापासून मी यश दयालसोबत रिलेशनशिपमध्ये होती. या काळात गरज पडल्यास दयालने माझ्याकडून पैसेही घेतले होते. तसेच माझ्याव्यतिरिक्त इतर महिलांसोबतही यश दयालने असे कृत्य केलं आहे, असा दावाही या महिलने केला आहे. सदर महिलेने यश दयालसोबतच्या संभाषणाचे स्क्रीनशॉट, व्हिडिओ कॉल हिस्ट्री आणि फोटो पुरावे म्हणून सादर केले आहेत.

तक्रारदार महिलने तक्रारीत म्हटलं आहे की, गेल्या पाच वर्षापासून मी यश दयालसोबत रिलेशनशिपमध्ये आहे. लग्नाच्या बहाण्याने माझे भावनिक, मानसिक आणि शारीरिक शोषण केले जात आहे. यश दयालने मला त्याच्या कुटुंबाशी ओळख करून दिली आणि नेहमीच माझ्यासोबत पतीसारखा वागला. त्यामुळे मी त्याच्यावर विश्वास ठेवू लागली. जेव्हा फसवणूक माझ्या लक्षात आली आणि तिने विरोध केला तेव्हा मला मारहाण करण्यात आली. इतकेच नाही तर माझा मानसिक छळही करण्यात आला. या प्रकरणाची कायदेशीर पद्धतीने लवकरात लवकर आणि निष्पक्षपणे चौकशी करावी.

हे पाऊल केवळ तिच्यासाठीच नाही तर अशा संबंधांना बळी पडणाऱ्या सर्व मुलींसाठी महत्त्वाचे आहे, अशी मागणीही सदर महिलेने केली आहे.

२७ वर्षीय यश दयालने सप्टेंबर २०१८ मध्ये विजय हजारे ट्रॉफीमध्ये यूपीसाठी लिस्ट-अ मध्ये पदार्पण केलं. त्याच वर्षी या युवा खेळाडूनं रणजी करंडकातून प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केलं. यानंतर यश दयाल फेब्रुवारी २०१९ मध्ये सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीद्वारे यूपीसाठी टी-२० पदार्पण करण्यात यशस्वी झाला.

# ना संघाचा भाग, ना केले डेब्यूष्ठ आता थेट टीम इंडियासोबत 'हा' खेळाडू एजबॅस्टनमध्ये झाला स्पॉट

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई : लीड्स कसोटीतील पराभवानंतर, टीम इंडियाने पुढील सामन्यात इंग्लंडला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी तयारी सुरू केली आहे. २ जुलैपासून एजबॅस्टन, बर्मिंगहॅम येथे सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यापूर्वी विश्रांती घेण्याऐवजी, भारतीय खेळाडू घाम गाळत आहेत. टीम इंडियाचा प्रत्येक खेळाडू पुढील कसोटीच्या आव्हानासाठी स्वत:ला तयार करण्यासाठी पूर्ण प्रयत्न करत आहे. या मालिकेसाठी निवड न झालेला आणि आता अचानक भारतीय संघाच्या सरावाचा भाग बनलेला एक खेळाडू देखील या तयारीत मदत करत आहे. हा खेळाडू डावखुरा फिरकी गोलंदाज हरप्रीत ब्रार आहे.



एजबॅस्टनला पोहोचताच टीम इंडियाने दुसऱ्या कसोटी सामन्याची तयारी सुरू केली. शनिवार, २८ जून रोजी सरावाच्या दुसऱ्या दिवशी एक दृश्य पाहायला मिळाले ज्यामुळे सर्वांनाच आश्चर्य वाटले. टीम इंडियाच्या नेट सेशन दरम्यान, संघातील सर्व खेळाडूंव्यतिरिक्त, डावखुरा फिरकी गोलंदाज हरप्रीत ब्रार देखील गोलंदाजी करताना दिसला. हे आश्चर्यकारक दृश्य होते कारण ब्रार या दौऱ्यासाठी टीम इंडियाचा भाग नव्हता. याआधी लीड्स कसोटीच्या तयारीदरम्यानही तो दिसला नव्हता.

एजबॅस्टन येथे टीम इंडियाच्या सरावाचे वृत्तांकन करणारे स्वतंत्र पत्रकार संदीपन बॅनर्जी यांनी सोशल मीडियावर टीम इंडियाच्या सरावाचा हा व्हिडिओ पोस्ट केला आहे. त्यात अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदरसह ब्रार देखील नेटमध्ये गोलंदाजी करत असल्याचे दिसून येते. तथापि, यामध्ये एक फरक असाही दिसून आला की इतर सर्व खेळाडूंनी टीम इंडियाची सराव जर्सी घातली असताना, ब्रार अशा किटमध्ये नव्हता. यावरून हे स्पष्ट होते की एजबॅस्टन कसोटीपूर्वी तो अचानक या सरावात संघाचा भाग झाला आहे.

तसे, ब्रारचा टीम इंडियाच्या सरावात सहभाग चाहत्यांसाठी आश्चर्यकारक आहे. आयपीएलमध्ये पंजाब किंग्जकडून खेळणारा ब्रार, आजपर्यंत एकदाही टीम इंडियामध्ये निवडलेला नाही. अशा परिस्थितीत, वेगवान गोलंदाजांना अनुकूल परिस्थितीत फिरकी गोलंदाज म्हणून त्याचा सरावात सहभाग आश्चर्यकारक आहे. तसेच, इंग्लंड संघात डावखुरा फिरकी गोलंदाज नाही, तर टीम इंडियाकडे आधीच रवींद्र जडेजा आणि कुलदीप यादवच्या रूपात दोन वेगवेगळ्या प्रकारचे डावखुरा फिरकी गोलंदाज आहेत. याचे उत्तर येणाऱ्या काळातच मिळेल.

# हॅपी रिटायरमेंट जड्डू भाईष्ठ दुसऱ्या टेस्टपूर्वी जडेजाने घेतली निवृत्ती? पांत ने दिल्या शुभेच्छा

स्वर्णभूमी न्यूज



मुंबई : भारतीय खेळाडू सध्या इंग्लंडमध्ये आहेत आणि इंग्लंडमधेच पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. इंग्लंडमध्ये, टीम इंडियाच्या खेळाडूंनी टी-२० विश्वविजेता बनल्याच्या एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल केक कापून हा खास दिवस साजरा केला. गेल्या वर्षी २९ जून रोजी रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली रोमांचक अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला हरवून भारताने १७ वर्षानंतर विजेतेपद पटकावले. या खास प्रसंगी, संघाचा स्टार ऋषभ पंतने अष्टपैलू रवींद्र जडेजाची खिल्ली उडवली आणि टी-२० मधून निवृत्तीचे एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल अभिनंदन केले. त्याने त्याला केक खायला दिला आणि जड्डू भाईला निवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या.

इउउख ने केला व्हिडिओ शेअर

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने इंग्लंडमध्ये चाहत्यांसाठी टी-२० विश्वचषक विजेता होण्याच्या एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल आयोजित केलेल्या सेलिब्रेशनचा व्हिडिओ शेअर केला आहे. यामध्ये हॉटेल कर्मचारी 'टीम इंडिया' आणि 'चॅम्पियन्स ऑफ टी-२० विश्वचषक २०२४' असे लिहिलेले दोन केक घेऊन येत असल्याचे दिसून येते. कर्णधार शुभमन गिलने मोहम्मद सिराजला पुढे बोलावले आणि यशस्वी जयस्वालला बोलावले. केक कापण्यासाठी अर्शदीप सिंगला पुढे आणण्यात आले. शेवटी, सर्वांनी टी-२० विश्वचषक विजयाचा नायक आणि मालिकावीर जसप्रीत बुमराहला केक कापण्यास सांगितले. त्याने हा केक कापला आणि नंतर सर्वांनी तो साजरा केला.

या खास प्रसंगासाठी दोन केक आणण्यात आले होते. एकावर टीम इंडिया लिहिलेले होते आणि दुसऱ्यावर चॅम्पियन टी-२० वर्ल्ड कप २०२४ लिहिलेले होते. जसप्रीत बुमराहने पहिला केक कापला तर मोहम्मद सिराजने दुसरा केक कापला आणि सर्वांना खायला दिला. खेळाडूंनी एकमेकांना केक खायला दिला आणि ऋषभ पंतने अष्टपैलू रवींद्र जडेजाला टी-२० मधून निवृत्तीचे एक वर्ष पूर्ण झाल्याबद्दल विनोदाने अभिनंदन केले. ऋषभ पंतने जडेजाला चिडवले आणि म्हणाला, ''निवृत्तीच्या शुभेच्छा जड्डू भाई.'' यावर, अष्टपैलू खेळाडूने लगेच उत्तर दिले आणि आठवण करून दिली की त्याने फक्त एकच फॉरमॅट सोडला आहे. म्हणून त्याला आनंदी निवृत्ती म्हणू नका. जडेजा म्हणाला, ''भाऊ, मी फक्त एकाच फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली आहे. मी एकदिवसीय आणि कसोटी क्रिकेट खेळत आहे.''

# पंजाब किंग्जचा खेळाडू बनला पाकिस्तानचा हेड कोच, पीसीबी ने केली टेस्ट प्रशिक्षकाची घोषणा

स्वर्णभूमी न्यूज

मुंबई : पाकिस्तानच्या कसोटी संघाच्या नवीन मुख्य प्रशिक्षकाची घोषणा करण्यात आली आहे. ही जबाबदारी माजी पाकिस्तानी क्रिकेटपटू अझहर महमूदकडे सोपवण्यात आली आहे. तथापि, अझहर महमूद हे पाकिस्तानी संघाचे कार्यवाहक मुख्य प्रशिक्षक असतील. याचा अर्थ असा की पाकिस्तान क्रिकेट बोर्ड पूर्णवेळ मुख्य प्रशिक्षकाची घोषणा करेपर्यंत अझहर महमूद ही जबाबदारी सांभाळतील. अझहर महमूदने पाकिस्तानसाठी २१ कसोटी सामने खेळले, ज्यामध्ये त्याने ३९ विकेट्स घेतल्या आणि ३ शतकांसह ९०० धावाही केल्या. अझहर महमूद हा आयपीएलमध्ये खेळणाऱ्या पाकिस्तानच्या काही मोजक्या खेळाडूंपैकी एक आहे.



प्रीती झिंटाच्या आयपीएल संघ पंजाब किंग्जने प्रथम अझहर महमूदला आयपीएलमध्ये संधी दिली. तो २०१२ मध्ये पंजाब किंग्जकडून खेळला. २०१३ मध्येही तो त्याच संघात राहिला. अझहर महमूदला दोन्ही हंगामात १० लाखांपेक्षा जास्त रुपये मिळाले. त्यानंतर २०१४ मध्ये कोणत्याही आयपीएल संघाने त्याला खरेदी केले नाही, परंतु नंतर कोलकाता नाईट रायडर्सने या खेळाडूवर ५० लाख रुपयांना पैज लावली. अझहर महमूदचा आयपीएलमधील विक्रम अद्भुत होता. या खेळाडूने २३ आयपीएल सामने खेळले ज्यामध्ये त्याने एकूण २९ विकेट्स घेतल्या. त्याचा इकॉनॉमी रेट देखील प्रति षटक फक्त ७.८२ धावा होता. फलंदाजीत अझहर महमूदने २० पेक्षा जास्त सरासरीने ३८८ धावा केल्या, ज्यामध्ये २ अर्धशतके समाविष्ट होती.

मुख्य प्रशिक्षक म्हणून अझर महमूद यांची पहिली जबाबदारी दक्षिण आफ्रिकेविरुद्धची घरची मालिका असेल. ऑक्टोबरमध्ये दोन्ही संघांमध्ये दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाईल. त्यानंतर, पुढच्या वर्षी पाकिस्तान संघ बांगलादेश दौऱ्यावर दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळेल. एकूणच, या वर्षी पाकिस्तानला फक्त एक कसोटी मालिका खेळायची आहे, म्हणूनच पीसीबीने अझर महमूद यांची कार्यवाहक मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

# ललित मोदी म्हणतात, 'मला ठोठावलेला दंड बीसीसीआय कडून घ्या', सर्वोच्च न्यायालयाने फटकारले

स्वर्णभूमी न्यूज

दिल्ली :सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (३० जून) इंडियन प्रीमियर लीगचे माजी चेअरमन ललित मोदी यांची एक याचिका फेटाळली आहे. या याचिकेद्वारे मोदी यांनी सर्वोच्च न्यालयाला विनंती केली होती की त्यांना सक्तवसुली संचालनालयाने परकीय चलन व्यवस्थापन कायद्यांतर्गत ठोठावलेला १०.६५ कोटी रुपयांचा दंड बीसीसीआयला भरण्याचा आदेश द्यावा.

सर्वोच्च न्यालयातील न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा व आर. महादेवन यांच्या बेंचसमोर आज मोदी यांच्या याचिकेवरील सुनावणी पार पडली. यावेळी न्यायमूर्तींनी मोदी यांची याचिका फेटाळली. याचवेळी न्यायमूर्तींनी स्पष्ट केलं की मोदी हे उपलब्ध नागरी कायद्यांचा, उपायांचा लाभ घेण्यास पात्र असतील.

सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे की बीसीसीआय हे राज्यघटनेच्या कलम १२ अंतर्गत 'स्टेट' (राज्य) नाही. म्हणजेच ते थेट सरकारच्या नियंत्रणाखालील प्राधिकरण नाही किंवा सरकारप्रमाणे काम करणारी संस्था नाही. त्यामुळे कलम २२६ अंतर्गत थेट रिट अधिकारक्षेत्रात येत नाही. मात्र, ललित मोदी त्यांच्या कायदेशीर प्रक्रियेसाठी दिवाणी न्यायालयात जाऊ शकतात.

हीच याचिका ललित मोदी यांनी यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयासमोर सादर केली होती. त्यावेळी न्यायालयाने त्यांना एक लाख रुपयांचा दंड ठोठावला होता. तसेच त्यांची याचिका देखील फेटाळली होती.

मोदी यांनी मुंबई उच्च न्यायालयाकडे मागणी केली होती की सक्तवसुली संचालनालयाने त्यांना ठोठावलेला १०.६५ कोटी रुपयांचा दंड बीसीसीआयला भरण्याचा आदेश द्यावा. गेल्या वर्षी, १९ डिसेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली होती. न्यायालयाने त्यावेळी म्हटलं होतं की ''ललित मोदींवर लावलेला दंड हा फेमा अंतर्गत न्यायाधिकरणाने ठोठावला आहे. त्यामुळे ही याचिका निरर्थक व पूर्णपणे चुकीची आहे.''

ललित मोदींचं म्हणणं काय?

ललित मोदी यांनी त्यांच्या याचिकेत म्हटलं होतं की त्यांची बीसीसीआयच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. तसेच त्या काळात ते आयपीएलचं प्रशासकीय मंडळ असलेल्या बीसीसीआयच्या उपसमितीचे अध्यक्ष देखील होते. त्यामुळे बीसीसीआयने त्यांना भरपाई द्यावी. त्यावर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला दिला होता.

उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने त्यावेळी टिप्पणी केली होती की सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांना न जुमानता ललित मोदी यांनी ही याचिका दाखल केली आहे. उच्च न्यालायाने स्पष्ट शब्दांत सांगितलं होतं की सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही ललित मोदी यांनी २०१८ मध्ये ही याचिका दाखल केली होती.

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते 'महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी सेने'च्या चिन्हाचे अनावरण

**स्वर्णभूमी न्यूज**



नागपूर : शिवसेना प्रणित 'महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी सेना' या वीज क्षेत्रातील नव्याने स्थापन झालेल्या कामगार संघटनेच्या अधिकृत चिन्हाचे अनावरण आज राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

नागपूर येथे आयोजित मेळाव्यात हा अनावरणाचा सोहळा पार पडला, ज्यामुळे संघटनेच्या कार्याला आणि भविष्यातील वाटचालीस अधिकृतपणे सुरुवात झाली आहे.

या प्रसंगी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत अनेक महत्त्वाचे नेते उपस्थित होते. यामध्ये राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाठ, राज्यमंत्री ना. आशिष जैस्वाल, तसेच संघटनेचे मार्गदर्शक आमदार कृपाल तुमाने आणि आमदार मनीषा कायंदे यांचा समावेश होता. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते किरण पांडव यांचीही विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी 'महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी सेने'चे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेचे अध्यक्ष योगेश विटनकर, कार्याध्यक्ष मनोज मेश्राम आणि प्रवीण पाठराबे, तसेच महासचिव डॉ. अविनाश आचार्य यांनी या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार झाले. त्यांच्यासोबत दिलीप आवळे, जीवन डहाट, आशिष इंगळे, श्रीरंग दहासहस्र यांच्यासह संघटनेचे अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

या अनावरणामुळे 'महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी सेना' आता अधिकृतपणे वीज कामगारांच्या हितासाठी आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कार्य करणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालेल्या या अनावरणामुळे संघटनेला भविष्यात वीज कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना न्याय देण्यासाठी अधिक बळ मिळेल अशी अपेक्षा आहे.

# चांदस वाठोडा येथील रहीवासी स्व.कोंडबाजी गायकवाड यांचा जन्मशताब्दी सोहळा संपन्न

**स्वर्णभूमी न्यूज**




नागपूर : चांदस वाठोडा निवासी, स्व. कोंडबाजी गायकवाड यांचा जन्मशताब्दी सोहळा नागपुरात मोठ्या आनंदात संपन्न झाला. स्व.कोंडबाजी याचे पुत्र नवभारत विद्यालय, नागपूर येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक अरुण कोंडबाजी गायकवाड यांनी बद्रीनाथ सोसायटी महाकाली नगर मानेवाडा रोड नागपूर येथें कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दीपप्रज्वलन नतंर सकाळी वारकरी भजनाने प्रारंभ झाला.

सौ. माधुरीताई कोठे यांचे प्रवचन झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय महासचिव हरीश देशमुख होते. प्रस्तावित डॉ. नामदेवजी मोरे यांनी केले तर संचालन देवराजी टोंगे यांनी केले. मनोगतीय भाष्य माजी मुख्याध्यापक जयवंत भोसले आणि अशोक गोबरे यांनी केले. प्रमुख अतिथी ड. अभयरावजी गायकवाड होते. हरीश देशमुख यांनी याप्रसंगी चांदस गावाच्या आठवणी सांगितल्या १९४२ ला चले जावं आंदोलनात इंग्रजा विरुद्ध बंड गावातील होतकरू युवकांनी उभारले तेव्हा गायकवाड होते.

स्वातंत्र लढयात पोलिसांनी सर्व स्वातंत्र सैनिकांना अटक झाली तेव्हा सुप्रसिद्ध दरोडेखोर म्हणून झिंगराजी नाईकची कथा सांगून गोरगरिबांना साथ, अन्न धान्य पुरविणारे याचं पिढीतील गायकवाड लोकसेवक नेते होते. अशा शब्दांत प्रशंसा केली. हरीश देशमुख यांनी अंधश्रद्धा निर्मूलन विषयक संत गाडेगबाबा, संत तुकडोजी महाराज यांचे विचार समाजाला पोषक आहे असे सांगितले सौ. माधुरीताई कोठे यांनी प्रवचनात सेवेचे महत्व सांगतांना वयोवृध्द अवस्थेत सेवाभाव मुलांमुली कडून प्राप्त व्हावा. ही परंपरा कायम असावी.

असा उपदेश लोकांना दिला. त्यापुढे म्हणाल्या माणूस बनुन मानवाला मदत करणे गायकवाड कुटूंबियांचा उद्देश होता असे प्रतिपादन केले. याप्रसंगी स्व-ागतगीत अरुण गायकवाड यांनी म्हटले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी डॉ. उल्हासिनी गायकवाड, नामदेवराव मोरे, प्रफुल्ल घाडगे यांनी अथक परिश्रम घेतले. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# कामगार नेते नरेश अडचुले यांचा सेवानिवृत्तीपर भव्य सत्कार

**स्वर्णभूमी न्यूज**

नागपूर : महाराष्ट्र शासन गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त कामगार नेते नरेश अडचुले आपल्या ३५ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून सोमवारी एलआयसीतून सेवानिवृत्त झाले. यानिमित्ताने एलआयसी व्दारे त्यांचा सेवापुर्ती सत्कार सोहळा यशस्वीपणे पार पडला. याप्रसंगी एलआयसी पश्चिम शाखेचे वरिष्ठ शाखा व्यवस्थापक अतुल कुमार धामणे यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.



शाखा व्यवस्थापक अतुल कुमार धामणे यांनी अडचुले यांच्या बाबत गौरवोद्गार काढताना ग्राहकांना तत्पर व दर्जेदार सेवा देणाऱ्या त्यांच्या कर्तव्यदक्षपणा मुळेच पश्चिम शाखा अग्रणी असल्याचे मत व्यक्त केले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे अनिल ढोकपांडे, अध्यक्ष,पश्चिम क्षेत्रीय विमा कर्मचारी असोसिएशन, प्रशासकीय अधिकारी चंदा वानखेडे, एजंट असोसिएशनचे अध्यक्ष प्रमोद ठोंबरे, अजय इत्तडवार, प्रदीप मेहरे, विकास अधिकारी देवेश रानडे, आनंद मुठाळ, मोईन खान राजू जैन आदींनी आपआपल्या भाषणातून नरेश अडचुले यांच्या विविध गुणांचे कौतुक करण्यासोबतच त्यांच्या कडून कोणत्या बाबी शिकण्यासारख्या आहेत याची माहिती दिली व त्यांना सेवानिवृत्तीबद्दल शुभेच्छा दिल्या.

आपल्या सत्काराला उत्तर देताना नरेश अडचुले यांनी जीवनात आयुर्विम्याला व आयुर्विम्यात एलआयसीला पर्याय नसल्याचे गौरवोद्गार काढले. त्यांनी समस्त कर्मचारी, अधिकारी, विकास अधिकारी व अभिकर्त्यांनी सेवाकाळात दिलेले मोलाचे सहकार्य, मार्गदर्शन व भक्कम पाठिंब्याबाबत कृतज्ञता व्यक्त केली.

या निरोप समारंभाला कर्मचारी व अभिकर्ते मोठ्या संख्येनी उपस्थित होते. प्रास्ताविक मुकेश जुमडे यांनी केले. संचालन व उप-स्थितांचे आभार सहाय्यक शाखा व्यवस्थापक अजय खेडकर यांनी केले. यशस्वीतेसाठी सर्वश्री लता नंदनवार, राजेश चलपे, राहुल हरले, यतिंद्र बाकडे, वामन चलाख, शिरीष अणे, शशांक पुराणिक, मनोज बडकस, जॅन बागडे, बबलू हाते इ.नी कठोर परिश्रम घेतले.

# अवैध एचटीबीटी बियाणांविरोधात नागपूर जिल्ह्यात कृषी विक्रेत्यांचा बंद; १० कोटींचा व्यवसाय ठप्प

**स्वर्णभूमी न्यूज**



नागपूर : शासनाने अवैध ठरवलेल्या कपाशीचे एचटीबीटी बियाणे आणि कीटकनाशकांच्या विक्रीविरुद्ध नागपूर डिस्ट्रिक्ट ग्रो डीलर्स असोसिएशनच्या नेतृत्वात सोमवारी कडकडीत बंद पाळण्यात आला. तसेच संविधान चौकात निदर्शने करण्यात आली. कृषिसाहित्य विक्रेत्यांच्या या आंदोलनामुळे नागपूर जिल्ह्यातील एक हजारापेक्षा अधिक कृषी साहित्य विक्री केंद्रे बंद होती. यामुळे सुमारे दहा कोटी रुपयांचे व्यवहार प्रभावित झाल्याची माहिती आहे.

सध्या विदर्भात बिगर परवानाधारक एजंट्सचा सुळसुळाट आहे. हे एजंट अवैध असलेले कपाशीचे एचटी-बीटी बियाणे आणि कीटकनाशके थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचतात. आंध्र प्रदेश, गुजरात आणि तेलंगणमधून या बेकायदेशीर धंद्याची सूत्रे हलिविली जातात. बिगरपरवानाधारक एजंट्स बियाणे, कीटकनाशके, रासायनिक खते बोगस पद्धतीने आणि चुकीच्या पद्धतीचे मिश्रण वापरून विकतात. खत कंपनीकडून रासायनिक खते घेत असताना त्यासोबत लिंकिंग प्रॉडक्ट देण्यात येते. यातून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत आहे. ती शासनाने तत्काळ रोखायला हवी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

परवानाधारक कृषी केंद्र चालक सरकारला नियमित जीएसटी, प्राप्तीकर भरतात. स्टॉक बुकची नोंद ठेवतात. सॅम्पल फेल झाल्यावर कोर्टकचेरीत चकरा मारतात. याउलट, विना-परवाना कृषी साहित्याची विक्री करणाऱ्या अनधिकृत एजंट्सवर कुठलीही कारवाई होत नाही. बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांवर योग्य कारवाई व्हावी आणि हा अवैध विक्रीचा प्रकार बंद व्हावा, असे संघटनेचे म्हणणे आहे.

संविधान चौकात संघटनेचे अध्यक्ष अभिजित काशीकर, सचिव विजय चांडक, उपाध्यक्ष नितीन भोयर, कोषाध्यक्ष विजय लोहिया यांच्या नेतृत्वात सोमवारी निदर्शने करण्यता आली. या आंदोलनात सुमारे ६०० कृषिसाहित्य विक्रेत्यांनी सहभाग नोंदवला. यात मधुर बंग, नितीन पद्यावार, अभिलेख वैद्य, शेखर झाडे, आशिष सावजी, दीपक अग्रवाल, हरीश राठी प्रामुख्याने उपस्थित होते.

शेतात होणारी तणाची वाढ व त्यासोबतच वाढता मजुरांचा खर्च, यामुळे शेतकरी या तणनाशक बियाण्यांना प्राधान्य देतात. परंतु, त्या अवैध बियाण्यांचे पक्के बिल मिळत नाही. जर हे बियाणे बोगस निघाले किंवा कपाशीवर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव जाणवला, तर सरकारकडून मिळणारी नुकसानभरपाई शेतकऱ्यांना मिळत नाही. त्यातून शेतकऱ्यांचेच अधिक नुकसान होते, याकडे संघटनेने सरकारचे लक्ष वेधले आहे.

# विठ्ठल नगरात जेष्ठ नागरिकांचा सामुहिक सत्कार करून वाढदिवस साजरा

**स्वर्णभूमी न्यूज**




नागपूर : दक्षिण नागपूर येथील लाडीकर ले आऊट जेष्ठ नागरिक समिती विठ्ठल नगर क्र. १ नागपूरच्या वतीने समितीचे पदाधिकारी व सर्व कार्यकारिणीतील सदस्य यांचे सहमतीने समितीतील सदस्यांचा वाढदिवस महिन्यात शेवटच्या आठवड्यात सत्कार करून साजरा करण्यात येतो. सांगण्याचा तात्पर्य म्हणजे याच महिन्यात ६ सदस्यांचा सामूहिक वाढदिवस नुकताच २८ जून रोजी, सार्वजनिक हनुमान मंदिर विठ्ठल नगरात हा कार्यक्रम मोठ्या थाटात संपन्न झाला. त्यावेळी त्या सर्वांना शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये भानुदासजी शंकरपुरे, रमेशजी डफरे, शालीगामजी मडावी, अरुणजी घोरमाडे, प्रकाशजी उपलवार व सौ. बुलकोबाई ठाकुर या सर्वांचा सत्कार करण्यात आला. तसेच विठ्ठल नगर १ मधील कु. शाश्वती विनायक नाकाडे हिने लंडन ते फ्रान्स समुद्र खाडी ११ तास १९ मिनिटात पोहून केलेल्या विक्रमाबद्दल तिचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रामरावजी रेवतकर यांनी भूषविले व कार्यक्रमाला सुरुवात झाली.

संचालन शामरावजी गोमाशे यांनी केले तर प्रेमदासजी नंदनवार यांनी सर्वांचे आभार मानले व अल्पोपहारांनी कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी कार्यक्रमात ज्येष्ठांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली होती. उपस्थित किशोरजी मेश्राम, केवलरामजी पटोले, छगनराव खानोरकर यांची उपस्थिती होती. असे ज्येष्ठ नागरिक समितीचे अध्यक्ष प्रेमदास सोमाजी नंदनवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती दिली.

## बनावट उत्पन्नाचा दाखला दिल्यास मिळणार नाही मदत

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी, हैद्राबाद हाउस येथील कक्षामार्फत गरजु व पात्र रुग्णांना वैद्यकीय उपचाराकरीता अर्थसहाय्य अदा करण्याचे महत्वपूर्ण कामे केल्या जातात. यात रुग्णाच्या अर्जासोबत जोडण्यात येत असलेले उत्पनाचे प्रमाणपत्र जर बनावट आढळून आल्यास अशा रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमधुन अर्थसहाय्य अनुज्ञेय राहणार नाही असे प्रसिद्धीपत्रकान्वये सांगण्यात आले आहे.

उत्पन्नाचे प्रमाणपत्र आपले सरकार सेवा केंद्रामधुन अधिकृतरीत्या तयार करण्यात आले पाहिजे.

कोणत्याही दलालामार्फत अथवा एजंटमार्फत प्रमाणपत्र तयार करु नये.

# नागपुरात अवैध आश्रमाचा भांडाफोड; यादीत १६ मुलांची नोंद

**स्वर्णभूमी न्यूज**

नागपूर : बाल न्याय अधिनियमानुसार आवश्यक असलेले नोंदणी प्रमाणपत्र नसताना अनाथ सेवा आश्रमच्या नावाने ५०० ते १० हजार रुपये सर्वसामान्य लोकांकडून वसूल केले जात होते. येथे १६ अल्पवयीन मुले असून त्यातील काही अनाथ असल्याचे आश्रमातील एका कर्मचाऱ्याने सांगितले.

जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या चमूची मदत घेऊन या आश्रमाचा भंडाफोड करण्यात आला. तसेच पाचपावली पोलिसांच्या मदतीने दोन अल्पवयीन मुलांची सुटका करण्यात आली. आमचा आश्रम खूप जुना असल्याचे सांगून श्री अनाथ सेवा आश्रम या नावाने लोकांकडून पैसे गोळा करण्यासाठी एजंट ठेवले होते. घरोघरी फिरून ते अनाथ मुलांचा संदर्भ देऊन पैसे गोळा करू लागले. संवेदनशील मनाच्या नागरिकांनी अनाथ मुलांना मदत करणे पुण्याचे काम आहे, असे समजून मदतही केली. एजंटच्या रजिस्टरमध्ये याची नोंद असल्याचेही आढळून आले.

हिंगणा, बुटीबोरी, सेमिनार हिल्स, खडगाव रोड अशा शहराच्या वेगवेगळ्या भागांतील नागरिकांनी मदत केली. एजंटकडे असलेल्या पत्रकात 'अनाथ निराश्रित' असा स्पष्ट उल्लेख आहे.

यात मदतीसाठी पॅकेजच तयार करण्यात आले होते. कापड खर्च ५०० रुपये, एक वेळचा नाश्ता १ हजार रुपये, एक वेळचा भोजन खर्च १५०० रुपये, बर्थडे खर्च ३ हजार रुपये, एक दिवसाचा भोजन मिष्टान्न खर्च ३५०० रुपये, औषधोपचार खर्च ७ हजार रुपये, इतर खर्च १० हजार रुपये, अशा खर्चाचा त्यात समावेश होता.

आमच्याकडे १६ अनाथ मुले असल्याचेही हे एजंट नागरिकांना सांगत होते.

पोलिसांची चमू येण्यास तास ते दीड तास लागला. या वेळात तीन मुलांपैकी एक मुलगा तिथे नव्हता. अखेर दोन अल्पवयीन मुले असल्याने त्यांची सुटका करण्यात आली. बाल न्याय अधिनियमानुसार नोंदणी प्रमाणपत्र नसल्याचे आश्रम चालकाने पोलिसांसमोर कबूल केले.

पाचपावली ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक प्रमोद सोनवणे, पोलिस उपनिरीक्षक सुनील तिडके यांच्यासह मुकेश यादव, गीता अवस्थी, आशा पढवाल यांचा कारवाईत समावेश होता. पाचपावली पोलिस पुढील तपास करीत आहेत.

# 'आई, मी वैतागलोय, मुलीवर लक्ष ठेव'; नागपुरच्या व्यापाऱ्याची नदीत उडी पण तितक्यात...

**स्वर्णभूमी न्यूज**





नागपूर : 'आई, मी वैतागलो आहे, मुलगी व कुटुंबावर लक्ष ठेवशील,मी आता कधीही भेटणार नाही, असे म्हणत मौद्यातील नदीत उडी घेतलेल्या व्यापाऱ्याचा पोलिसांनी जीव वाचविला. नागपुरात ही घटना घडली असून पंकज राजेंद्र खोब्रागडे रा. वाडी,असे व्यापाऱ्याचे नाव आहे.

पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, पंकज याचा गादीचा कारखाना आहे. काही दिवसांपूर्वी त्याने व्यवसायासाठी बँकेतून कर्ज घेऊन १२ लाखांचा जेसीबी घेतला. तो ३५ हजार रुपये हप्ता भरायला लागला. दरम्यान त्याला जेसीबीतून आवश्यक तेवढे उत्पन्न मिळणे बंद झाले. तो तणावात राहायला लागला. शनिवारी मोबाइल बंद करून तो एसयूव्हीने घरून निघाला. सायंकाळ होऊनही तो घरी परतला नाही.

नातेवाइकांनी शोध घेतला असता पंकज आढळला नाही. वाडी पोलिसांनी पंकज बेपत्ता असल्याची नोंद केली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेश तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलिस उपनिरीक्षक विनोद कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी शोध सुरू केला. तो आढळला नाही.

सोमवारी दुपार २ वाजताच्या सुमारास पंकजने मोबाइल सुरू केला. आईच्या मोबाइलवर संपर्क साधला. आत्महत्या करीत असल्याचे त्याने आईला सांगितले. आई घाबरली. नातेवाइकांसह वाडी पोलिस ठाणे गाठून माहिती दिली. याबाबत कळताच कांबळे यांनी लगेच सायबर पोलिसांकडून पंकजचे लोकेशन काढले. तो मौद्यातील नदी परिसरात असल्याचे समोर आले. कांबळे हे मित्राच्या कारने लगेच मौद्याकडे रवाना झाले. तेथील ओळखीच्या व्यक्तीशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. मौदा पोलिसांशी संपर्क साधण्यास सांगितले. त्याने पोलिस नियंत्रण कक्षाला कळविले. नियंत्रण कक्षाने मौदा पोलिसांना सांगितले.

माहिती मिळताच मौद्याचे ठाणेदार सारिन दुर्गे यांच्यासह पोलिसांचा ताफा तिकडे रवाना झाला. दरम्यान कांबळेही तेथे पोहोचले. यावेळी पंकज हा पुलावर उभा होता. पोलिसांना बघताच त्याने नदीत उडी घेतली. त्याक्षणी पोलिस आणि स्थानिकांनीही नदी उडी घेत त्याला सुखरुप बाहेर काढले आणि त्याचा जीव वाचवला. आर्थिक चणचणीतून आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे त्याने सांगितले.

# नागद्वार यात्रा १९ जुलैपासून, मध्य प्रदेश सरकारकडून दहा दिवसांची परवानगी



**स्वर्णभूमी न्यूज**

नागपूर: नागद्वार यात्रेकरिता यंदा दहा लाखांहून अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. यापूर्वी दहा दिवसांत आठ लाख भाविकांची नोंद करण्यात आली आहे. मागील काही वर्षांत या यात्रेत सहभागी होणाऱ्यांची संख्या वाढली आहे. विशेषतः युवकांची संख्या अधिक दिसून येत आहे. परिणामी यावेळी दहा लाख यात्रेकरू येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. वाढीव गर्दीचा अंदाज घेऊन व्यवस्था करण्याची विनंती महादेव मेळा समितीतर्फे करण्यात आली आहे.

प्रसिद्ध नागद्वार यात्रा येत्या १९ जुलैपासून सुरू होणार असून यासाठी मध्यप्रदेश सरकारने यंदा दहा दिवसांची परवानगी दिली आहे. १९ ते २९ जुलै दरम्यान ही यात्रा होईल.

नागद्वार यात्रेसाठी नागपूर तसेच आजूबाजूच्या परिसरातून मोठ्या संख्येने भाविक जातात. शहरातील जुन्या वस्त्यांमधून जत्थेच्या जत्थे या यात्रेसाठी निघतात. गेल्या अनेक वर्षांपासून या यात्रेसाठी विविध मंडळे कार्यरत आहेत. पचमढी क्षेत्रातील सातपुडा पर्वतरांगेत असलेले नागद्वार तीर्थक्षेत्र हे सातपुडा टायगर रिझर्व्ह कोअर झोनमध्ये येते. त्यामुळे यावर्षी कोणत्याही भाविकांनी सोबत नेलेले प्लास्टिक पर्वतरांगेत फेकण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. प्लास्टिक संकलनासाठी प्रशासन आणि सेवाभावी मंडळांतर्फे विशेष व्यवस्था केली जाणार आहे.

महादेव मेळा समितीची नुकतीच पचमढी येथे बैठक झाली. बैठकीला सीईओ एस. एस. रावत, महादेव नागद्वार यात्रा पचमढी बचाव कृती समितीचे कार्याध्यक्ष उमाकांत झाडे, क्षेत्र नागद्वार स्वामी सेवा महासमितीचे अध्यक्ष भगवान गिरडकर, सचिव देवानंद भांगे, निशानगढ सेवा मंडळाचे पदाधिकारी गुणवंत झाडे आदींची उपस्थिती होती. या बैठकीत मंडळांना यात्रेच्या पाच दिवस आधी आणि यात्रा झाल्यानंतर दोन दिवस वस्तू वाहतुकीसाठी प्रशासन मदत करणार आहे. मंडळांना अन्न शिजवण्यासाठी मागणीनुसार एलपीजी सिलेंडर उपलब्ध करून दिले जातील. रेलिंग सीडी दुरुस्ती केली जाईल. कचरा पेट्या उपलब्ध करून दिल्या जातील, असे प्रशासनाकडून आश्वासन देण्यात आले. सोबतच सुरक्षेसाठी पोलिस व्यवस्था उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. नागद्वार यात्रेकरिता यंदा दहा लाखांहून अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. यापूर्वी दहा दिवसांत आठ लाख भाविकांची नोंद करण्यात आली आहे. मागील काही वर्षांत या यात्रेत सहभागी होणाऱ्यांची संख्या वाढली आहे. विशेषतः युवकांची संख्या अधिक दिसून येत आहे. परिणामी यावेळी दहा लाख यात्रेकरू येण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. वाढीव गर्दीचा अंदाज घेऊन व्यवस्था करण्याची विनंती महादेव मेळा समितीतर्फे करण्यात आली आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क झालेच पाहिजे ? यासाठी उपोषण कर्त्यांचे सामाजिक न्यायमंत्र्याना साकडे

**स्वर्णभूमी न्यूज**



नागपूर: नागपुर सुधार प्रन्यास द्वारा नारा येथे आरक्षित झालेल्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अंतरराष्ट्रीय पार्क झाले पाहिजे याकरिता समितीद्वारे सामाजिक न्यायमंत्री यांनी दखल घेउन सदर पार्क निर्माण करावा अशी मागणी करण्यात आली. सदर पार्क करीता नागपुर सुधार न्यास द्वारा १९९६ साली नारा येथील १३० एकर क्षेत्रावर पार्क करीता आरक्षीत करण्यात आले होते. जागा हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू असतांनाच भूमाफियाच्या दबावाखाली येऊन नागपुर सुधार न्यास द्वारा सदर प्रस्तावास प्रशासकीय अधिकारी यांच्याद्वारे आज तागायत दुर्लक्षित करण्यात आले.

सदर आरक्षित जागेवर पार्क चं झाला पाहिजे यासाठी गेल्या पंचवीस वर्षांपासून स्थानिक नागरीकांकडुन मागणी होत आहे. परंतु त्या काळात असलेल्या उदासिन लोकप्रतिनिधी मुळे सदर पार्क आजतागायत निर्माण झालेला नाही, तेव्हा सदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क झाले पाहिजे याकरिता डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क समिती अध्यक्ष चंदू पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून सदर प्रकार उजेडात आणला. या बाबींची दखल घेऊन परिसरात असलेल्या सामाजिक कार्यकर्ते व महिला सातत्याने २७२ दिवसांपासून उपोषण करत आहेत, जर हा पार्क लवकर निर्माण नाही झाला तर समिती अध्यक्ष चंदू पाटील व महिला सदस्य यांनी आमरण उपोषण करु पण पार्क निर्माण झाल्याशिवाय आम्ही माघार घेणार नाही. असा संकल्प करण्यात आला. असे मंत्री महोदय यांच्या निदर्शनास आणून दिले यादरम्यान सामाजिक न्यायमंत्री संजय सीरसाठ हे नागपुर येथे आले असता, सामाजिक न्याय भावनेने आपण हा पार्क निर्माण करण्यासाठी पुढाकार घेऊन आपल्या शासनाच्या कार्यकाळात पुर्ण करावा असे साकडे सामाजिक न्यायमंत्री संजय सीरसाठ यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क समिती द्वारे घातले गेले. याप्रसंगी समिती अध्यक्ष चंदू पाटील, गजानन जांगडे, राजेश पाटील, अजय खोब्रागडे, रवि चव्हाण, प्रफुल्ल खोब्रागडे, शंकर सोमकुवंर, विलास शेवाळे, तसेच गेल्या दहा महिन्याप-ासून सातत्याने उपोषण कर्त्या महिला यमुना रामटेके,रेखा खोब्रागडे, शशिकला चालखुरे, विजया पाटील, वनीता वालदे, अल्का रक्षित, जिजा रामटेके, भारती वानखेडे, वत्सला बेले, वंदना सहारे आशा डहाट,सुनीता सांगोळे, बेबीताई गजभिये,चंदा वाघमारे, सुषमा कांबळे, तसेच करणं यादव, रोशन यादव, सतीश गौर, सरोज मेश्राम, देविसिंग, हर्ष भंडारे, रोहीत भारतकर, मुकुल वासनिक,बालु भागेश्वर, भिमराव दाभाडे यासह समिती सदस्य उपस्थित होते. डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क निर्माण करण्यासाठी पुढाकार घेऊन येत्या काळात

संबंधित विभागाच्या मंत्री महोदय यांच्याशी चर्चा करून पार्क निर्माण करण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यात येईल. सामाजिक न्यायमंत्री संजय सीरसाठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पार्क निर्माणाकरीता प्रशासकीय यंत्रणा द्वारा वेळ खाऊ धोरणांचा अवलंब केल्यास येणाऱ्या काळात आमरण उपोषण करण्यात येइल, व हे आंदोलन महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात करण्यात येइल.

# सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियान १ जुलैपासून

**स्वर्णभूमी न्यूज**

नागपूर: पावसाळ्यात नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, यासाठी नागपूर महान-गरपालिका आणि नागपूर स्मार्ट सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता विभागातर्फे आरोग्याच्या संदर्भात सहा मूलमंत्रांवर भर देत येत्या १ जुलैपासून ३१ जुलै दरम्यान शहरात सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियान राबविले जाणार आहे.

पावसाळ्यात साथीच्या रोगाला बळी पडण्याची अधिक शक्यता असते. यासाठी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. याकरिता स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत सफाई अपनाओं, बीमारी भगाओ अभियान राबविले जाणार आहे. यात हाताची स्वच्छता राखणे, घराची स्वच्छता राखणे, परिसर स्वच्छ ठेवणे, शौचालयाची स्वच्छता राखणे, नाल्या व सांडपाण्याची जागा स्वच्छ ठेवणे, तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता राहणार नाही, याची काळजी घेण्याच्या संदर्भात लोकांमध्ये जनजागृती केली जाणार आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात ही मोहिम राबविली जाणार असून, नागरिकांनी मोहिमेत सक्रीय सहभाग घ्यावा असे आवाहन मनप-ाद्वारे करण्यात आले आहे.

# आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरामध्ये १५ टक्के सूट मिळणार

**स्वर्णभूमी न्यूज**

मुंबई : एसटीच्या लांब व मध्यम पल्ल्याच्या (१५० कि.मी. पेक्षा जास्त) प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या पूर्ण तिकीट धारी (सवलतधारक प्रवासी वगळून) प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना दिवाळी व उन्हाळी सुट्टीचा गर्दीचा हंगाम वगळता वर्षभर सुरू राहणार आहे. या योजनेची सुरुवात जुलैपासून करण्यात येत आहे. तरी प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

१ जूनला एस टी च्या ७७ व्या वर्धापन दिनी परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी कमी गर्दीच्या हंगामामध्ये लांब पल्ल्याच्या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आगाऊ आरक्षण केल्यास त्यांच्या तिकीटामध्ये १५ टक्के सूट देण्यात येईल अशी घोषणा केली होती. त्यानुसार ही योजना सर्व प्रकारच्या बससाठी १ जुलैपासून लागू करण्यात येत आहे अर्थात, ही योजना पूर्ण तिकीट काढणाऱ्या प्रवाशांसाठीच लागू राहणार आहे.

आषाढी एकादशी व गणपती उत्सवात प्रवाशांना लाभ

येत्या आषाढी एकादशीला व गणपती उत्सवासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो. राज्यभरातून पंढरपूर येथे जाणाऱ्या नियमित बसेसचे आरक्षण प्रवाशांनी केल्यास त्यांना त्यांच्या तिकीट दरात १५ टक्के सवलत उद्यापासून (१ जुलै) लागू होत आहे. तथापि जादा बसेससाठी ही सवलत लागू असणार नाही. तसेच गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमानी प्रवाशांना देखील आगाऊ आरक्षण केल्यानंतर या तिकिटाचा लाभ घेता येऊ शकतो.

मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या प्रतिष्ठित इ-शिवनेरी बसमधील प्रवाशांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल. आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांनी प्रत्यक्ष तिकीट खिडकीवर, र्पीलिश्रळल.ींीलिी.लो या एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा ींीलि ईी ठशीर्शीरिलेप या मोबाईल ॲपद्वारे तिकीट आरक्षित केल्यास त्यांना १५म सवलत प्राप्त करता येऊ शकते.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी एसटी महामंडळानं १५ टक्के भाडेवाढ केली होती. या

# नाशिक महानगरपालिकेमध्ये शिंदे, फडणवीसांचा उद्धव ठाकरे शिवसेनेला सुरुंग, ३५ पैकी उरले ५ नगरसेवक

**स्वर्णभूमी न्यूज**

नाशिक : महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मिळून उद्धव ठाकरे शिवसेनेला सुरुंग लावून पक्ष पूर्णपणे पोखरला आहे. नाशिक महानगरपालिकेच्या मागील निवडणुकीत उद्धव सेनेचे ३५ नगरसेवक निवडून आले होते. यातील अनेक नगरसेवक नगरपालिकेतील भाजपा आणि शिंदे गटाच्या गळाला लागले असून आता केवळ उद्धव ठाकरे गटात ५ नगरसेवक उरले आहेत.

नाशिक जिल्ह्यात दारुण पराभव - नाशिक जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे पक्षाला चांगले यश मिळाले. नाशिक लोकसभा मतदारसंघात उद्धव सेनेचे राजाभाऊ वाजे निवडून येत खासदार झाले. मात्र उद्धव ठाकरे शिवसेनेचा हा आनंद काही दिवसांपुरताच राहिला. सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे शिवसेनेचा महाराष्ट्रासह नाशिक जिल्ह्यात दारुण पराभव झाला आणि पक्षात गळती होण्यास सुरुवात झाली. सत्ता नसल्याने आपल्या प्रभागात देखील आपण निवडून येऊ का, या भीतीने अनेक नगरसेवकांनी उद्धव ठाकरे पक्षाला जय महाराष्ट्र करत भाजपा आणि शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे नाशिकमध्ये उद्धव ठाकरे पक्ष खिळखिळा झाला असून ३५ पैकी केवळ ५ नगरसेवक उरले आहेत.

शिंदे पक्षाची ताकद वाढली - गेल्या अडीच वर्षात नाशिक शहरातील उद्धव ठाकरे पक्षाचे २५ माजी नगरसेवक एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत दाखल झाले आहेत. त्याचबरोबर एक महानगरप्रमुख आणि एक जिल्हाध्यक्ष फोडण्यात शिंदेंच्या शिवसेनेला यश आलं आहे. मागील काही महिन्यात उद्धव सेनेच्या ३ माजी नगरसेवकांचे निधन झालेले आहे. तर २ माजी नगरसेवक भाजपात दाखल झाले आहेत. त्यामुळे नाशिकमध्ये भाजपाबरोबरच शिंदे शिवसेना पक्षाची ताकद वाढली आहे.

उद्धव ठाकरे यांचे प्रयत्न अपयशी - गेल्या अडीच वर्षात उद्धव ठाकरे पक्षातील अनेक माजी नगरसेवकांनी पक्षाला जय महाराष्ट्र केल्याने पदाधिकारी कार्यकर्त्यांमध्ये मरगळ आली होती. म्हणून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नाशिकमध्ये पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा फारसा फायदा झाला नाही. काही महिन्यातच पक्षातील प्रमुख सुधाकर बुरगुजर यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. त्यापाठोपाठ विलास शिंदे यांनी पक्षाला जय महाराष्ट्र करत आठ माजी नगरसेवकांसह शिंदे शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे आता एक-एक पदाधिकारी पक्षाची साथ सोडत असल्याने नाशिकमध्ये उद्धव ठाकरेंची शिवसेना खिळखिळी झाल्याचे चित्र आहे.

पाच नगरसेवक उरले - उद्धव ठाकरे शिव-सेनेतील ३५ माजी नगरसेवकांपैकी आता केवळ डी. जी. सूर्यवंशी, मंगला आढाव, केशव पोरजे, सुनीता कोठावळे आणि प्रशांत दिवे हे पाच नगरसेवक ठाकरेंकडे उरले आहेत. गेल्या ३० वर्षांपासून पक्षात काम करीत होतो. परंतु न्याय मिळाला नाही. माझ्यापेक्षा ज्युनिअर असलेल्यास थेट जिल्हाध्यक्ष करण्यात आलं. त्यांना जिल्ह्यातील धड तालुके, गावेही माहीत नाहीत. त्यामुळे मी नाराज होतो. आगामी निवडणुकीत नाशिक महानगर पालिकेवर भगवा फडकवणार आहे. अजून अनेक माजी नगरसेवक शिंदे सेनेत येतील असं नुकतंच उद्धव ठाकरेंच्याकडून शिंदे सेनेत दाखल झा-लेले माजी नगरसेवक विलास शिंदे यांनी म्हटलं आहे.

# येऊरमध्ये वाढदिवस साजरा करणे पडले महाग, एकावर गुन्हा दाखल

**स्वर्णभूमी न्यूज**

ठाणे : येऊरच्या जंगलात वाढदिवस साजरा करणे तरुणाला महागात पडले असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमरिश ठाणेकर असे त्या तरुणाचे नाव आहे. तो ठाण्यातील कोपरी भागात राहतो.संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा परिसर असलेला येऊरचा भाग हा ठाणे महापालिका क्षेत्रात येतो. हा परिसर पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात मोडतो. असे असतानाही या भागात हॉटेल्स, धाबे आणि रिसॉर्ट्स बिनधास्तपणे सुरू असतात. या ठिकाणी रात्रीच्या पार्ट्या सुरू असून या पार्ट्यांमध्ये डीजे लावला जातो. फटकेही फोडण्यात येतात. त्याचा परिणाम वन्यजीवांवर होतो. हे मुद्दे सातत्याने उपस्थित होत असले तरी त्याठिकाणी प्रभावीपणे कारवाई होत नाही.

अशाचप्रकारे, येऊरमध्ये रात्री फटाके फोडून वाढदिवस साजरा केल्याचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर वायरल झाला होता. त्यानंतर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पदाधिकारी स्वप्नील महिंद्रकर यांनी देखील येऊर परिसरात रात्री उशिरापर्यंत धिंगाणा सुरु




असून, वनविभाग आणि ठाणे महापालिका प्रशासनाच्या वरदहस्ताने हॉटेल्स, धाबे आणि रिसॉर्ट्स बिनधास्तपणे सुरू असल्याचा गंभीर आरोप केला होता. याबाबत राजकीय पातळीवर देखील तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. त्यामुळे आता येऊरमध्ये पार्टीचे आयोजन करणाऱ्यांवर गुन्हा दाखल केले जात आहेत.

येऊरच्या जंगलातील एका शेतघरावर (फार्महाऊस) शुक्रवारी अमरिशने वाढदिवस साजरा करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा परिसर वन्यक्षेत्र आणि संवेदनशिल क्षेत्र म्हणून घोषीत असतानाही वन्यजिवाला हानी होईल अश्या प्रकारे फटाके, लाऊडस्पिकर परवानगी नसताना लावल्यामुळे अमरिश याच्यावर वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उद्धव-राज ठाकरे यांच्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कडाडले; 'दोन्ही भाऊ एकत्र चहा प्यायले तरी आम्हाला...'

**स्वर्णभूमी न्यूज**

मुंबई : हिंदी सक्तीविरोधात ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर फडणवीस सरकारने त्रिभाषा धोरणाचा निर्णय रद्द केलाय. त्यामुळे नियोजित ५ जुलै रोजी आता उद्धव आणि राज ठाकरे विजयी सभा घेणार आहेत. मराठी भाषेच्या मुद्द्यावर उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आलेत. कदाचित हे दोघेही राज्यातील महापालिका निवडणुका एकत्र लढतील, अशी अटकळ बांधली जातेय. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर मोठे विधान केलंय. ठाकरे बंधू एकत्र येण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''दोन भाऊ एकत्र आले तर आम्हाला काहीच हरकत नाही. ते एकत्र येऊ शकतात, चहा पिऊ शकतात, क्रिकेट खेळू शकतात, टेनिस खेळू शकतात किंवा पोहायला जाऊ शकतात किंवा काहीही करू शकतात. त्यामुळे आम्हाला काही फरक पडत नाही.''

भाजपामध्ये लोकशाही आहे : महाराष्ट्रातील भाजपा प्रदेशाध्यक्षाचे नाव निश्चित झाले आहे. रवींद्र चव्हाण यांना पक्षप्रमुखपदाची जबाबदारी देण्यात येत असल्याचं



विचारल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''भाजपामध्ये लोकशाही आहे. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदाची निवडणूक घेण्यासाठी किरण रिजिजू येत आहेत. रवींद्र चव्हाण यांनी अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला आहे. उद्या संध्याकाळी ५ वाजल्यानंतर अंतिम घोषणा केली जाणार आहे. जर इतर कोणी उमेदवारी अर्ज दाखल केला नाही तर रवींद्र चव्हाण यांचे नाव जाहीर केले जाणार आहे.''

आपल्या देशात कोणत्याही भाषेला विरोध नाही : महाराष्ट्रात सुरू असलेल्या 'हिंदी विरुद्ध मराठी' वादावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिलीय. ते म्हणाले की, ''आपल्या देशात कोणत्याही भाषेला विरोध नाही. त्यांचे काम वळण लावणे आहे, पलटूराम हे त्यांच्यासाठी योग्य नाव आहे. दोन भाऊ एकत्र आलेत ही चांगली गोष्ट आहे. या सरकारला कोणीही वाकवू शकत नाही. आम्ही एक समिती स्थापन केली आहे. समिती निर्णय घेईल, त्यानंतर आम्ही निर्णय घेऊ,'' असंही देवेंद्र फडणवीसांनी अधोरेखित केलंय.

लोकशाहीमध्ये लोकांचा आवाज ऐकणारे हे सरकार : देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात पहिली ते बारावीपर्यंत हिंदी सक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. उद्धव ठाकरे यांनी ते मान्य केले होते. आम्ही एक समिती स्थापन केली आहे. ती निर्णय घेईल असंही उद्धव ठाकरेंनी सांगितलंय.'' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''हे झुकणारे सरकार नाही. लोकशाहीमध्ये लोकांचा आवाज ऐकणारे हे सरकार आहे.''

# विधिमंडळ प्रवेशिकेवरून राजमुद्रा काढणे, संविधान बदलण्याची मानसिकता : अनिल देशमुख

**स्वर्णभूमी न्यूज**

नागपूर : राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारपासून मुंबईत सुरुवात झाली . विधिमंडळ परिसरात प्रवेश देण्यासाठी सचिवालयाकडून प्रवेशिका देण्यात येतात. यावेळी त्यावरून राजमुद्रा गायब आहे. यावरून नवा वादंग निर्माण झाला आहे. प्रवेशिकेवरून राजमुद्राच गायब असल्याचे समोर आल्याने विरोधकानी त्याला आक्षेप घेतला आहे.

विधिमंडळात प्रवेश करण्यासाठी प्रसार माध्यम प्रतिनिधी तसेच इतर संबंधितांना दिलेल्या ओळखपत्रावरील अशोकस्तंभ ही राजमुद्रा यावेळी प्रकाशित करण्यात आलेली नाही. अशा प्रकारे विधिमंडळ प्रवेशिका तयार करून राजमुद्रा हटवण्याचा विचार महायुती सरकारचा आहे का? असा प्रश्न विरोधकांनी केला आहे. याबाबत माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी राज्य सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे.

गेल्या काही वर्षांपासून संविधान बदलाची भाषा भाजपचे खासदार, नेते करीत आहेत. लोकसभा निवडणुकीत देखील हा मुद्दा गाजला होता. त्यानंतर भाजपने त्यासंदर्भात स्पष्टीकरण देण्यास सुरवात केली होती.



आता परत भाजप आणि संघाचे लोक देखील संविधानातील काही गोष्टींबाबत उलटसुलट भाष्य करीत आहेत. विधिमंडळ प्रवेशिकावरून राजमुद्रा काढून टाकणे हा संविधानाला नाकारण्याचा प्रकार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेले संविधान बदलण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणजे राजमुद्रा विधिमंडळ प्रवेशिकांवरून काढण्याचा प्रकार आहे, असा आरोपही देशमुख यांनी केला.

विशेष म्हणजे, पाच दिवसांपूर्वी म्हणजे, २५ जून रोजी आणीबाणीच्या निषेधार्थ राज्य सरकारकडून देण्यात आलेल्या जाहिरातीवरून राजमुद्रा हटविण्यात आली होती. त्याऐवजी सेंगोल दर्शवण्यात आला होता. त्यासंदर्भात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारवर टीका केली होती. राज्य सरकारने आणीबाणीसंदर्भात कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करत जाहिरातबाजी केली आहे.

सरकारी जाहिरातीतून राजमुद्रा गायब असून सेंगोल दाखवला आहे. सेंगोल कशाचे प्रतीक आहे, हे वेगळे सांगायला नको. भाजपाला लोकशाही आणि संविधान संपवून गोळवलकर यांचे 'बंच ऑफ थॉट' लागू करायचे आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला होता.

मुद्रक, प्रकाशक व मालक वैभव रुपराव जोगी यांच्या वतीने मिडिया प्रिन्ट ७९७, मिश्रा किराणा स्टोर्स जवळ, नविन बाबुळखेडा, पार्वती नगर, नागपूर - ४४००२७ येथे मुद्रित करून दैनिक स्वर्णभूमी, ५५८, नविन बाबुळखेडा, नागपूर - ४४००२७ जिल्हा नागपूर (महाराष्ट्र राज्य) येथून प्रकाशित. संपादक - बुध्दमाला वैभव जोगी (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदार) मो. ९४२०२९९१०१ Mail : swarnabhoomidaily@gmail.com